दैनिक

# राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द

संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रू. ४.०० I अंक २३२ I शुक्रवार ५ जून २०२६

I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com



‘सहजयोग’
भाग ७२

## कुंडलिनी...

जगातल्या पाठीवर कुठंही चर्चिला गेलेला नाही जितका आपल्या भारत वर्षात झालेला आहे कारण हिंदुस्थान ज्याला आपण पूर्वी भारतवर्ष म्हणत होतो, हि एक योग भूमि आहे. बाकी सगळ्या भोग भूमि आहेत. हिच एक योग भुमि आहे आणि म्हणून इथे फार मोठमोठ्या प्रवृत्तींनी म्हटलं पाहिजे किंवा देवांनी अवतार घेतलेले आहेत...आपल्या शास्त्रांमध्ये कुंडलिनीबद्दल इतकं सुंदर वर्णन दिलेलं आहे. म्हणजे हिंदू शास्त्र म्हणण्यापेक्षा, भारतातल्या लोकांना त्याचं जेवढं ज्ञान झालेलं आहे ते कुणालाही सबंध पृथ्वी लोकांत नाही झालं. तस ब्राह्मणत्वाचे नाटक करता येत नाही. हे असलीयत आहे, खरी गोष्ट आहे. असायला पाहिजे,ते एक अस्तित्व आहे. जसा पक्षी दोनदा जन्माला पावतो तसाच मनुष्य सुध्दा दोनदा जन्माला पावतो. हे सर्व धर्माच्या लोकांनी सांगितलेलं आहे. गुरु तोच जो तुमच्यापेक्षा वर जाऊन आणि ज्याला आत्मसाक्षात्कार देता आला पाहिजे. १६ सप्टेंबर १९७३(पुणे)

अधिक माहितीसाठी www.sahajayogamumbai.org 8871519191

सौजन्य : निर्मला धाम आश्रम, आरडगाव राहुरी

# खा. भाऊसाहेब वाकचौरे शिंदे शिवसेनेची पताका हाती घेणार!

**अशोक दुशिंग I राष्ट्र सह्याद्री**

शिर्डी : शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे खासदार भाऊसाहेब राजाराम वाकचौरे ठाकरे सेनेतून शिंदे शिवसेनेने जाणार अशा चर्चा सध्याच्या राजकारणात जोर पकडू लागल्या असून त्यांनी शिर्डी येथील खा. संजय राऊत यांच्या उपस्थितीत मेळाव्यास दांडी मारल्याने त्यांचा रस्ता शिंदे शिवसेना गटाकडे असल्याचे दिसून येत आहे.

गेल्या आठवड्यात राज्याचे उदयोग मंत्री उदय सामंत यांची त्यांनी भेट घेतल्याने मिशन टायगर च्या चर्चाना वेग आला होता. मात्र शिर्डीतील मेळाव्यातील त्यांची अनुपस्थिती बरेच काही सांगून जात आहे. खा वाकचौरे यांना दलबदलू पणा नवीन नाही त्यांनी पहिली शिर्डी लोकसभा निवडणूक २००९ साली शिवसेनेकडून खा रामदास आठवले यांचे विरोधात लढवली. त्यात त्यांनी रामदास आठवले यांचा मोठ्या मताधिक्याने पराभव करत अहमदनगर जिल्ह्यात शिवसेनेचा भगवा फडकावला. २०१४ च्या दुसऱ्या लोकसभा निवडणुकीत त्यांनी शिवसेना सोडून काँग्रेस पक्षात प्रवेश करत काँग्रेस पक्षातर्फे लढवली त्यांचे विरोधात नवखे असे उमेदवार शिवसेनेकडून सदाशिव लोखंडे हे होते.



त्यात मात्र त्यांचा पक्ष बदलण्याचा फटका त्यांना बसत पराभवाला सामोरे जावे लागले. तिसऱ्या वेळी २०१९ ला ही त्यांना पराभव पत्करावा लागला. मात्र आता शिव सेना ठाकरे शिवाय पर्याय नाही म्हणून त्यांनी पुन्हा २०२४ मध्ये नशीब आजमावले त्यात ते विजयी ठरले. २०२४ ते २०२६ या दोन वर्षांच्या काळात ते तसे ठाकरे सेनेत रममान नव्हते. त्यांची ती खंत त्यांचे चेहऱ्यावर स्पष्ट पणे दिसत होती.

विरोधी पक्षात राहून विकास निधी मिळत नाही हि त्यांची खंत असावी. मात्र ते शिंदे सेनेत गेल्यास माजी खासदार सदाशीव लोखंडे यांची मात्र मोठी अडचण होणार आहे. जेव्हा शिवसेना फुटली तेव्हा शिंदे सेनेत जाणारे पहिले खासदार लोखंडे होते. शिर्डी च्या मेळाव्या दरम्यान ठाकरे सेनेचे उपनेते मा. खा. चंद्रकांत खैरे यांनी वाकचौरेनी शिंदे सेनेची वाट धरली. आता त्यांना कुणीही थांबवू शकत नाही असे वक्तव्य केले होते. त्यांच्या या वक्तव्यामुळे वाकचौरे हे शिंदे सेनेत गेल्याचे स्पष्ट होत असून आता केवळ औपचारिकता बाकी असल्याचे बोलले जात आहे.

मात्र त्यांना शिंदे सेना पक्षात घेऊन त्या बदल्यात काय देते हे पहाणे औत्सुक्याचे ठरणार आहे. कारण वाकचौरे हे सहजासहजी तिकडे प्रवेश करणार नाही ते काही तरी पदरात पाडून घेतील. आता एकनाथ शिंदे त्यांना कसे खुश करून पक्षात प्रवेश देतात हा खरा कळीचा मुद्दा असून त्यासाठीच त्यांचा पक्ष प्रवेश अडकला असल्याची चर्चा आहे. आता ते सध्या संसद कमीटीच्या चार राज्यांचा दोऱ्यावर असून माध्यमांकडे व्यक्त होताना त्यांनी अशा प्रकारच्या चर्चा रंगवल्या जात असून पक्ष प्रवेशा वर मौन बाळगले आहे.

## महत्त्वाचे..

### स्त्री रोगतज्ञ डॉक्टर, पुरवठा निरीक्षक 'लाच लुचपत'च्या जाळ्यात

रत्नागिरी : चिपळूण मधील कामथे उपजिल्हा रुग्णालयातील स्त्री रोगतज्ञ डॉक्टर कांचन मदार लाच लुचपत विभागाच्या जाळ्यात अडकल्या आहेत. ४५०० रुपयांची लाच घेताना डॉक्टर कांचन मदार यांना रंगेहात पकडल्याने रत्नागिरी जिल्ह्यातील वैद्यकीय क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे. गर्भपाताच्या गोळ्यांचे किट देण्यासाठी त्यांनी लाच मागितली होती. सुशिक्षित महिलेच्या तक्रारीनंतर जवळपास सहा तासात अँटी करप्शन ब्युरो च्या अधिकाऱ्यांनी सापळा रचत कारवाई केली. डॉक्टर कांचन मदार हे वैद्यकीय क्षेत्रातील रत्नागिरी जिल्ह्यातलं मोठं नाव आहे. शुल्लक रकमेची लाच घेताना अटक झाल्याच्या वृत्तानंतर जिल्ह्यामध्ये खळबळ उडाली आहे. दरम्यान, धुळे तहसील कार्यालयातील पुरवठा निरीक्षक तथा शासकीय गोदाम व्यवस्थापकाला ५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागानं रंगेहात पकडले आहे.

# प्राजक्त तनपुरे बिनविरोध आमदार

## सुजय-संग्राम ‘जय-वीरू’ जोडीची राजकीय कमाल



**प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर स्थानिक प्राधिकरण मतदारसंघाच्या विधानपरिषद निवडणुकीत भारतीय जनता पक्षाचे उमेदवार प्राजक्त तनपुरे यांची बिनविरोध निवड निश्चित झाल्याने जिल्ह्यात भाजप आणि महायुतीच्या राजकीय ताकदीची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे. विरोधकांकडून एकही सक्षम उमेदवार मैदानात न उतरल्याने महायुतीने ही निवडणूक बिनविरोध करून दाखवत महत्त्वाचा राजकीय विजय मिळवला.

सुरुवातीला ही जागा महाविकास आघाडीकडून काँग्रेसच्या वाट्याला गेल्याची चर्चा होती. तर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) कडून खासदार राणी लंके यांचे नाव चर्चेत होते. मात्र प्रत्यक्षात महाविकास आघाडीतील कोणत्याही पक्षाने अधिकृत उमेदवार उभा केला नाही.

नामनिर्देशन अर्ज मागे घेण्याच्या अंतिम टप्प्यापर्यंत प्राजक्त तनपुरे यांच्यासह श्रीरामपूरचे नगराध्यक्ष करण ससाणे, श्रीगोंद्याचे दत्तात्रय पानसरे, कमलेश गांधी आणि मच्छिंद्र धुमाळ यांचे अर्ज शिल्लक होते. गुरुवारी दुपारपर्यंत कमलेश गांधी आणि मच्छिंद्र धुमाळ यांनी माघार घेतली. काही काळ करण ससाणे संपर्काबाहेर गेल्याने राजकीय वातावरणात उत्सुकता निर्माण झाली होती. मात्र त्यांनीही अर्ज मागे घेतल्याने निवडणुकीचे चित्र अधिक स्पष्ट झाले.

यानंतर प्राजक्त तनपुरे यांच्या विरोधात दत्तात्रय पानसरे यांचा एकमेव अर्ज शिल्लक राहिला होता. अखेर अर्ज मागे घेण्याच्या मुदतीच्या शेवटच्या क्षणी पानसरे यांनीही माघार घेतल्याने प्राजक्त तनपुरे यांची बिनविरोध निवड निश्चित झाली. भाजपमध्ये नुकतेच प्रवेश केलेले तनपुरे आता अहिल्यानगर जिल्ह्यातील १८ वे आमदार ठरले आहेत.या संपूर्ण राजकीय घडामोडीत डॉ. सुजय विखे पाटील आणि आमदार संग्राम जगताप यांच्या भूमिकेची विशेष चर्चा रंगली. अर्ज मागे घेण्याच्या अंतिम टप्प्यात दत्तात्रय पानसरे यांनी अर्ज बळजबरीने मागे घेतल्याचा आरोप केल्याने जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

या पार्श्वभूमीवर आमदार संग्राम जगताप आणि दत्तात्रय पानसरे यांच्यात बंद दाराआड सविस्तर चर्चा झाली. चर्चे नंतर दोघेही एकाच वाहनातून बाहेर पडल्याने राजकीय वर्तुळात विविध तर्क-वितर्कांना उधाण आले. अखेर पानसरे यांनी माघारीची भूमिका कायम ठेवत अर्ज मागे घेतला आणि बिनविरोध निवडीचा मार्ग मोकळा झाला.

राजकीय निरीक्षकांच्या मते, डॉ. सुजय विखे पाटील आणि आमदार संग्राम जगताप यांनी दाखविलेल्या समन्वय, संवादकौशल्य आणि राजकीय व्यवस्थापनामुळेच शेवटच्या क्षणी निर्माण झालेला पेच सुटला. त्यामुळे जिल्ह्यात या जोडीची तुलना लोकप्रिय ‘जय-वीरू’ जोडीशी केली जात आहे.

आ. तनपुरे बिनविरोध विजयामागे डॉ. सुजय विखे पाटील यांनी मागील चार दिवसांत घेतलेले **(पान ४ वर)**

### दत्तात्रय पानसरे यांचे नाराजीनाट्य

**निवडणूक घोषित झाल्यापासून महाविकास आघाडी लढणार नसल्याची चर्चा होती, ती अखेर खरी ठरली. श्रीरामपूरचे नगराध्यक्ष करण ससाणे आणि श्रीगोंद्याचे दत्तात्रय पानसरे यांनी निवडणुकीत रंग भरण्याची हवा केली. मात्र प्रत्यक्षात राजकीय सेटलमेंट नंतर करण ससाणे यांनी माघार घेतली. दत्तात्रय पानसरे यांनी माघारीवर आपली सही खोटी असल्याचा आरोप करत जिल्हाधिकारी कार्यालयात आंदोलन सुरू केले. सायंकाळी उशिरापर्यंत त्यांचे नाराजी नाट्य रंगले. मात्र आमदार संग्राम जगताप यांच्याशी बंद दारावर झालेल्या चर्चेनंतर त्यांच्या नाराजी नाट्यावर पडदा पडला. आता त्यांच्या बंद दाराआडच्या चर्चेतला 'अर्थ' कुणाला समजला नाही? असे नव्हे..!**

# भाजप-काँग्रेसकडून राज्यसभेसाठी उमेदवार जाहीर

**प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री**

**नवी दिल्ली :** राज्यसभेच्या आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाजपप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) आणि काँग्रेसने आपल्या उमेदवारांची घोषणा केली असून, देशातील विविध राज्यांतील राजकीय समीकरणांना वेग आला आहे.

### काँग्रेसकडून खर्गे, पवन खेरा, मन्सूर अली खान मैदानात

काँग्रेसने कर्नाटक, मध्य प्रदेश, राजस्थान, तामिळनाडू आणि झारखंड या राज्यांसाठी उमेदवार जाहीर केले आहेत. पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, पक्षाचे राष्ट्रीय प्रवक्ते पवन खेरा आणि मन्सूर अली खान यांना कर्नाटकमधून उमेदवारी देण्यात आली आहे. मध्य प्रदेशातून माजी खासदार मीनाक्षी नटराजन, राजस्थानमधून नीरज डांगी, तामिळनाडूमधून प्रवीण चक्रवर्ती आणि झारखंडमधून प्रणव झा यांना पक्षाने संधी दिली आहे. विशेष म्हणजे काँग्रेसच्या माध्यम आणि प्रसिद्धी विभागाचे अध्यक्ष पवन खेरा यांना यावेळी राज्यसभेची उमेदवारी मिळाल्याने राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे. २०२२ मध्ये उमेदवारी न मिळाल्यानंतर त्यांनी व्यक्त केलेली खंत मोठ्या प्रमाणात चर्चेत आली होती. आता पक्षाने त्यांच्यावर विश्वास दाखवत राज्यसभेची संधी दिली आहे. दरम्यान, राज्यसभेच्या २७ जागांसाठी निवडणूक होत असून, सध्याच्या संख्याबळानुसार एनडीएकडे १८ जागांवर आघाडी असल्याचे चित्र आहे. काँग्रेस आघाडीला पाच जागा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. तर झारखंड मुक्ती मोर्चा (जेएमएम), तामिळगा वेत्री कळघम (टीव्हीके) आणि इतर प्रादेशिक पक्षांनाही काही जागांवर संधी मिळण्याची शक्यता आहे. २४४ सदस्यांच्या राज्यसभेत सध्या एनडीएचे १४९ सदस्य असून विरोधी पक्षांकडे ७८ सदस्य आहेत. त्यामुळे या निवडणुकीनंतरही सभागृहात एनडीएचे वर्चस्व कायम राहण्याची शक्यता राजकीय विश्लेषकांनी व्यक्त केली आहे.

# तृणमूलमध्ये मोठी फूट

- ६० आमदार बंडखोर गटासोबत
- ऋतब्रत बॅनर्जी विरोधी पक्षनेते
- ममता बॅनर्जींसमोर अस्तित्वाचे आव्हान

**प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री**

**कोलकाता :** पश्चिम बंगालच्या राजकारणात मोठी उलथापालथ झाली असून माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसमध्ये अभूतपूर्व फूट पडल्याचे स्पष्ट झाले आहे. पक्षातील ८० पैकी तब्बल ५८ ते ६० आमदारांनी बंडखोर नेते ऋतब्रत बॅनर्जी यांच्या नेतृत्वाला पाठिंबा दिला असून विधानसभा अध्यक्षांनी त्यांना विरोधी पक्षनेते म्हणून मान्यता दिल्याने ममता बॅनर्जी यांना मोठा राजकीय धक्का बसला आहे.

विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर तृणमूल काँग्रेसमध्ये असंतोष वाढत होता. अखेर बंडखोर आमदारांनी स्वतंत्र गट स्थापन करत ऋतब्रत बॅनर्जी यांची विधिमंडळ पक्षनेते म्हणून निवड केली. या गटाने आपल्याकडे दोन-तृतीयांशपेक्षा अधिक आमदारांचे समर्थन असल्याचा दावा केला आहे. या घडामोडींनंतर तृणमूल काँग्रेसने राज्यातील सर्व संघटनात्मक समित्या आणि आघाड्या बरखास्त करण्याचा निर्णय घेतला आहे. पक्षाची पुनर्रचना करून वाढता असंतोष रोखण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे मानले जात आहे. राजकीय विश्लेषकांच्या मते, ही फूट केवळ बंगालपुरती **(पान ४ वर)**

# विधान परिषद निवडणुकीत महायुतीचा दबदबा!

## सहा जागांवर बिनविरोध विजय : उर्वरित ११ मतदारसंघांत महायुती-मविआ आमनेसामने

**प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई :** महाराष्ट्र विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज संस्था मतदारसंघातील १७ जागांसाठी सुरू असलेल्या निवडणूक प्रक्रियेत महायुतीने आपले राजकीय वर्चस्व सिद्ध करत सहा जागा बिनविरोध जिंकण्यात यश मिळवले आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या अंतिम दिवशी राज्यभरात नाट्यमय घडामोडी घडल्या. अनेक ठिकाणी बंडखोरांनी माघार घेतली, तर काही ठिकाणी महाविकास आघाडीला उमेदवार टिकवण्यात अपयश आले.

भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) यांच्या महायुतीने एकत्रितपणे निवडणूक व्यवस्थापनाचे कौशल्य दाखवत सहा जागांवर बिनविरोध विजय मिळवला. विशेषतः अहिल्यानगर, रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग, ठाणे आणि पुणे येथे विरोधकांना उमेदवार टिकवता आले नाहीत.

अहिल्यानगरमध्ये माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांच्या विरोधातील सर्व उमेदवारांनी शेवटच्या क्षणी माघार घेतल्याने त्यांचा बिनविरोध विजय निश्चित झाला. रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग मतदारसंघात अनिकेत तटकरे यांच्यासमोरचे सर्व आव्हान संपुष्टात आले. ठाण्यात रवींद्र फाटक, पुण्यात विक्रम काकडे, यवतमाळमध्ये दुष्यंत चतुर्वेदी आणि वर्धा-चंद्रपूर-गडचिरोलीमध्ये अरुण लखाणी यांनी बिनविरोध विजय मिळवला.

दरम्यान, उर्वरित ११ मतदारसंघांत महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यात थेट लढती **(पान ४ वर)**

### आता होणार थेट लढती

**नाशिक**
नरेंद्र दराडे (शिवसेना) विरुद्ध गोकुळ गीते

**सांगली-सातारा**
धैर्यशील कदम विरुद्ध अभयसिंह जगताप

**नागपूर**
डॉ. राजीव पोतदार (महायुती) विरुद्ध अतुल लोंढे (काँग्रेस)

**सोलापूर**
राजेंद्र राऊत (भाजप) विरुद्ध वसंतराव देशमुख (राष्ट्रवादी शरद पवार)

**नांदेड**
अमर राजूरकर (महायुती) विरुद्ध रामदास पाटील (काँग्रेस)

**भंडारा-गोंदिया**
नरेश ईश्वरकर (राष्ट्रवादी) विरुद्ध दिलीप बनसोड (काँग्रेस)

**अमरावती**
प्रवीण पोटे पाटील (भाजप), हर्षजीत देशमुख (काँग्रेस), निलेश विश्वकर्मा (वंचित)

**परभणी-हिंगोली**
सईद खान (शिवसेना), डॉ. विवेक नावंदर (उबाठा), सुशील देशमुख (अपक्ष)

**धाराशिव-लातूर-बीड**
बसवराज पाटील (भाजप) विरुद्ध महेश देशमुख (काँग्रेस)

**जळगाव**
नंदकिशोर महाजन (भाजप) विरुद्ध शरद तायडे (ठाकरे सेना)

**छत्रपती संभाजीनगर-जालना**
सुहास शिरसाट (भाजप) विरुद्ध गणेश लोखंडे (ठाकरे सेना)

### बिनविरोध विजयी महायुतीचे उमेदवार

**अहिल्यानगर**
प्राजक्त तनपुरे (भाजप)

**वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली**
अरुण लखाणी (भाजप)

**ठाणे**
रवींद्र फाटक (शिवसेना)

**यवतमाळ**
दुष्यंत चतुर्वेदी (शिवसेना)

**पुणे**
विक्रम काकडे (राष्ट्रवादी काँग्रेस)

**रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग**
अनिकेत तटकरे (राष्ट्रवादी काँग्रेस)

# ऊसतोड मजुराच्या चार लेकींची मुंबई पोलीस दलात भरारी!

## जीवाचीवाडीच्या चौरे भगिनींची जिद्द, संघर्ष आणि कर्तृत्वाची प्रेरणादायी गाथा

**प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री**

**बीड :** केज तालुक्यातील बालाघाटच्या डोंगररांगांमध्ये वसलेल्या जीवाचीवाडी या छोट्याशा गावातून उगवलेली ही यशोगाथा आज संपूर्ण महाराष्ट्राला प्रेरणा देणारी ठरली आहे. ऊसतोड मजूर म्हणून आयुष्यभर कष्ट करणाऱ्या हनुमंत चौरे यांच्या चारही मुलींनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत थेट महाराष्ट्र पोलीस दलात स्थान मिळवले आहे. विशेष म्हणजे चौघीही सध्या मुंबई पोलीस दलात कार्यरत असून आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवत आहेत.

उषा, अर्चना, शितल आणि गीतांजली या चौरे भगिनींच्या यशामागे संघर्ष, जिद्द आणि अथक परिश्रमाची प्रेरणादायी कहाणी दडलेली आहे. ऊसतोडीसाठी राज्यभर भटकंती करणाऱ्या कुटुंबात जन्मलेल्या या मुलींनी अभावांशी दोन हात करत शिक्षण पूर्ण केले आणि खाकी वर्दीचे स्वप्न साकार केले.

कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असतानाही हनुमंत चौरे आणि त्यांच्या पत्नीने मुलांच्या शिक्षणात कोणतीही तडजोड केली नाही. चार मुली आणि दोन मुलांना शिकवण्यासाठी त्यांनी अक्षरशः रक्ताचे पाणी केले. मुली शिकल्या पाहिजेत आणि स्वतःच्या पायावर उभ्या राहिल्या पाहिजेत हा एकच ध्यास त्यांनी उराशी बाळगला.

चौरे भगिनींनी पहिली ते दहावीपर्यंतचे शिक्षण जीवाचीवाडी येथील जिल्हा परिषद शाळेत पूर्ण केले. गावातील मर्यादित सुविधा, आर्थिक अडचणी आणि ग्रामीण भागातील अनेक संकटांवर मात करत त्यांनी शिक्षण सुरू ठेवले. त्याचबरोबर पोलीस दलात भरती होण्याचे स्वप्नही जपले.

अंबाजोगाई येथील भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्रात कठोर सराव, शारीरिक तयारी आणि अभ्यासाच्या जोरावर त्यांनी पोलीस भरतीची परीक्षा यशस्वीरीत्या पार केली. आधी दोन बहिणींनी मुंबई पोलिस दलात प्रवेश मिळवला, तर आता उर्वरित दोन बहिणींनीही खाकी वर्दी मिळवत चौरे कुटुंबाचा अभिमान द्विगुणित केला.

एकाच गरीब ऊसतोड कामगार कुटुंबातील चार सख्ख्या मुली एकाच वेळी मुंबई पोलीस दलात कार्यरत असणे ही दुर्मिळ आणि अभिमानास्पद घटना आहे. चौरे भगिनींनी केवळ आपल्या कुटुंबाचेच नव्हे तर संपूर्ण जीवाचीवाडी, केज तालुका आणि बीड जिल्ह्याचे नाव राज्यभर उज्ज्वल केले आहे.



# जागतिक अस्थिरतेच्या वादळात अडकलेली भारतीय अर्थव्यवस्थेची नाव..!




जग आज एका अभूतपूर्व आर्थिक आणि राजकीय वळणावर उभे आहे. रशिया-युक्रेन युद्ध, पश्चिम आशियातील संघर्ष, अमेरिका-चीनमधील वाढती स्पर्धा, जागतिक व्यापारातील अनिश्चितता आणि हवामान बदल यांसारख्या घटनांनी संपूर्ण जगाच्या अर्थकारणाची समीकरणे बदलून टाकली आहेत. या जागतिक घडामोडी हजारो किलोमीटर दूर घडत असल्या, तरी त्याचे पडसाद महाराष्ट्रातील शेतकरी, मजूर, व्यापारी आणि सामान्य नागरिकांच्या जीवनावर उमटत आहेत. त्यामुळे जागतिक अर्थव्यवस्थेतील बदलांचा विचार करताना ग्रामीण भारताचे वास्तव समजून घेणे अधिक महत्त्वाचे ठरते.

आज भारत जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या मोठ्या अर्थव्यवस्थांपैकी एक आहे. जगातील अनेक देश आर्थिक मंदी, महागाई आणि बेरोजगारीच्या संकटाशी झुंज देत असताना भारताचा विकासदर सहा टक्क्यांपेक्षा अधिक राहण्याची अपेक्षा आहे. डिजिटल व्यवहार, पायाभूत सुविधांवरील गुंतवणूक, उत्पादन क्षेत्रातील वाढ आणि मजबूत अंतर्गत बाजारपेठ ही भारताची मोठी ताकद आहे. मात्र या चमकदार आकडेवारीमागे काही कठोर वास्तव दडलेले आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यासह राज्यातील ग्रामीण भागाचा विचार केला, तर महागाईचा सर्वाधिक फटका शेतकरी आणि सामान्य कुटुंबांना बसत आहे. खत, बियाणे, डिझेल, औषधे आणि मजुरीचे दर सातत्याने वाढत आहेत. शेती उत्पादन खर्च वाढत असताना उत्पन्नात त्यानुसार वाढ होत नाही. जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या किमती वाढल्या की त्याचा परिणाम थेट डिझेलच्या दरांवर होतो आणि त्याचा परिणाम शेतीच्या प्रत्येक टप्प्यावर दिसून येतो. त्यामुळे शेतकऱ्यांचे अर्थकारण अधिकच अडचणीत येते.

हवामान बदल हे ग्रामीण अर्थव्यवस्थेसमोरील आणखी एक मोठे संकट आहे. अवकाळी पाऊस, गारपीट, दुष्काळ आणि अतिवृष्टी यामुळे शेतीचे नियोजन कोलमडून पडत आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात गेल्या काही वर्षांत कांदा, डाळिंब, ऊस आणि इतर पिकांना हवामानातील बदलांचा मोठा फटका बसल्याचे अनुभवास आले आहे. शेती हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असताना त्याची वाढती असुरक्षितता चिंतेची बाब आहे.

दुसरीकडे भारतासाठी काही मोठ्या संधीही निर्माण होत आहेत. चीनवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी अनेक जागतिक कंपन्या पर्यायी उत्पादन केंद्रांचा शोध घेत आहेत. भारताला याचा लाभ मिळू शकतो. औद्योगिक गुंतवणूक, उत्पादन क्षेत्राचा विस्तार आणि सेवा क्षेत्रातील वाढ यामुळे रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होऊ शकतात. मात्र या संधींचा लाभ ग्रामीण युवकांपर्यंत पोहोचवण्यासाठी कौशल्य विकासाला प्राधान्य द्यावे लागेल.

आज बेरोजगारी ही ग्रामीण समाजासमोरील मोठी समस्या आहे. उच्च शिक्षण घेतलेल्या युवकांनाही अपेक्षित रोजगार मिळत नाही. कृत्रिम बुद्धिमत्ता, ऑटोमेशन आणि डिजिटल तंत्रज्ञानामुळे रोजगाराचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे. भविष्यात केवळ पारंपरिक शिक्षण पुरेसे ठरणार नाही. तांत्रिक कौशल्ये, डिजिटल साक्षरता आणि आधुनिक उद्योगांच्या गरजांनुसार प्रशिक्षण घेणे अत्यावश्यक ठरणार आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेतील आणखी एक चिंताजनक बाब म्हणजे वाढते वैयक्तिक कर्ज. ग्रामीण भागातही आता गृहकर्ज, वाहनकर्ज, ग्राहक कर्ज आणि मोबाईल ॲपद्वारे मिळणाऱ्या कर्जांचा वापर वाढत आहे. उत्पन्नाच्या तुलनेत कर्जाचे ओझे वाढल्यास भविष्यात आर्थिक संकट निर्माण होऊ शकते. आर्थिक शिस्त आणि बचतीची सवय यांचे महत्त्व आज अधिक वाढले आहे.

भारतातील डिजिटल क्रांती ही निश्चितच आशादायक बाब आहे. यूपीआय व्यवहार, ऑनलाइन बँकिंग आणि डिजिटल सेवा ग्रामीण भागातही वेगाने पोहोचत आहेत. यामुळे आर्थिक व्यवहार अधिक पारदर्शक झाले आहेत. मात्र डिजिटल साक्षरतेसोबतच सायबर फसवणुकीपासून नागरिकांचे संरक्षण करणेही तितकेच आवश्यक आहे.

भारताकडे युवा मनुष्यबळ, मोठी बाजारपेठ, मजबूत लोकशाही व्यवस्था आणि तंत्रज्ञानाची क्षमता आहे. त्यामुळे जागतिक अनिश्चिततेच्या काळातही भारत प्रगतीचा मार्ग शोधू शकतो. मात्र विकासाचा लाभ केवळ शहरांपुरता मर्यादित राहून चालणार नाही. शेती, ग्रामीण उद्योग, शिक्षण, आरोग्य आणि रोजगार यांना समान प्राधान्य देणारी विकासनीतीच देशाला खऱ्या अर्थाने मजबूत बनवू शकते.

जागतिक अर्थकारणातील वादळे थांबतील की नाही, हे सांगणे कठीण आहे. मात्र भारताने आपल्या अंतर्गत ताकदीवर विश्वास ठेवत शाश्वत विकासाचा मार्ग स्वीकारला, तर हे संकटच भविष्यातील मोठ्या संधीमध्ये रूपांतरित होऊ शकते. ग्रामीण भारत सक्षम झाला, तरच भारत महासत्ता होण्याचे स्वप्न वास्तवात उतरेल. त्यामुळे आज गरज आहे ती केवळ विकासदर वाढविण्याची नाही, तर सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणणाऱ्या विकासाची.

# पाऊस आणि वादळी वाऱ्यामुळे सौर ऊर्जा प्रकल्पाचे नुकसान

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**बालाजी देडगाव :** नेवासा तालुक्यातील बालाजी देडगाव येथे गतरात्री झालेल्या पाऊस आणि प्रचंड वेगाने वाहणाऱ्या वादळी वाऱ्यामुळे परिसरातील राजेंद्र कारभारी चेडे या शेतकऱ्यांचे १८६ गट नंबर मधील एका सौर ऊर्जा प्रकल्पाला (Sola PowePlant) मोठा फटका बसला आहे. या नैसर्गिक आपत्तीत प्रकल्पातील १० सोलर पॅनेल्स हवेत उडून गेले असून, लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवला जात आहे.

गेल्या काही दिवसांपासून उष्णतेचा पारा वाढलेला असताना, काल रात्री अचानक हवामानात बदल झाला. रात्री ९ च्या सुमारास विजांच्या कडकडाटासह आणि सुसाट वाऱ्यामुळे मुख्य फटका गाव बाहेरील सौर ऊर्जा प्रकल्पाला बसला. वादळाचा वेग इतका प्रचंड होता की, सोलर पॅनेल्सचे लोखंडी फाउंडेशन उचकटून निघाले आणि अनेक पॅनेल्स शेजारच्या शेतांमध्ये जाऊन पडले. सुदैवाने रात्र असल्याने जीवित हानी टळली.

वादळामुळे जवळपास सोलर पॅनेल्स फुटले असून ते पूर्णपणे निकामी झाले आहेत. प्लांटच्या मुख्य कंट्रोल रूममध्ये पाणी शिरले. यामुळे महागडे इन्व्हर्टर आणि केबल ट्रान्सफॉर्मरमध्ये शॉर्ट-सर्किट होऊन यंत्रणा कोलमडली.



# शेतीच्या कारणावरून प्रा. रोडे यांना जिवे मारण्याची धमकी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** अहिल्यानगर जिल्हा कनिष्ठ महाविद्यालय संघटनेचे जिल्हा कार्यकारणी सदस्य व नेवासा येथील श्री ज्ञानेश्वर महाविद्यालयातील प्रा. गोवर्धन रोडे यांना त्यांच्या नेवासा तालुक्यातील गोणेगाव येथील शेतीच्या किरकोळ कारणावरून चार-पाच जणांच्या टोळक्याने धक्काबुक्की व शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी नेवासा पोलीस स्टेशनला चौघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत माहिती अशी की, प्रा. गोवर्धन मच्छिंद्र रोडे, रा. गोणेगाव, ता. नेवासा जि. अहिल्यानगर त्यांच्या शेतामध्ये पाईपलाईनचे काम चालु असताना यांच्या जेसीबी कडुन यातील आरोपी यांची प्रा. रोडे यांच्या शेतातील पाईपलाईन फुटली असता यातील आरोपी यांना त्याचा राग येवुन त्यांनी प्रा. रोडे यांना धक्काबुक्की व शिवीगाळ केली तसेच फिर्यादी रोडे हे त्यांना समजावुन सांगत होते की मी तुमची पाईप लाईन दुरुस्त करून देतो परंतु यातील आरोपी अर्जुन परसराम रोडे, रविंद्र परसराम रोडे, विराज रविंद्र रोडे, शितल रविंद्र रोडे, सर्व (रा. इमामपुर, ता.नेवासा यांनी त्यांचे काहीएक एकले नाही व यातील फिर्यादी प्रा.गोवर्धन रोडे यांना लाथाबुक्याने मारहाण करुन जीवे ठार मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी प्रा.गोवर्धन रोडे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस नाईक अशोक लिपणे हे करत आहेत.

# श्रीरामपूर नगरपरिषदेच्या वाचनालयाचे काम बंदच

**शफीक बागवान | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** मोठ्या थाटामाटात प्रशासकीय राजवटीत विशेष अनुदान योजनेतून श्रीरामपूर शहरात सुमारे ७५ लाख रुपयांचे वाचनालय अभ्यासिका बरोबरच साकारत असलेल्या स्पर्धा परीक्षा केंद्राचे काम सध्या बंद आहे. हे काम का रखडले ही बाब गुलदस्त्यात आहे. जय हिंद युथ क्लब स्पर्धा परीक्षा केंद्र अभ्यासिका आणि वाचनालय अशा स्वरूपाचे वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान योजनेतून हे स्पर्धा परीक्षा केंद्र सुरू करण्यात येणार आहे.

सद्यस्थितीत वाचनालयाचे फाउंडेशन आणि भिंतीचे काम पूर्ण झाले आहे. शहरातील कर्मवीर चौकातील मिनी स्टेडियम मैदाना वरील जुन्या तलाठी कार्यालयाच्या जागेत हे वाचनालय अर्धवट स्थितीत गेल्या वर्षभरापासून सांगडा स्वरूपात उभे आहे. वाचनालयात स्वच्छ पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, पुरेसा प्रकाश आणि वातानुकूलित व्यवस्थेचा समावेश आहे.जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात अशा प्रकारचे वाचनालय उभे राहत आहे. श्रीरामपूर नगरपालिकेने या वाचनालयाला लवकरच मूर्त स्वरूप देण्याचे धोरण आखले होते. बांधकाम होत असलेल्या या वाचनालयाच्या चौकातून महाविद्यालयात दररोज हजारो विद्यार्थी जातात. सध्या या वाचनालयाचे बांधकाम बंद असल्याने त्यांचे आपोआपच याकडे लक्ष वेधले जात आहे.विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून अतिशय महत्त्वाच्या ठिकाणी बांधण्यात येत असलेल्या या वाचनालयाचे बांधकाम अचानक बंद असल्याने महाविद्यालयीन विद्यार्थ्याबरोबरच अनेक ज्येष्ठ नागरिक इतर विद्यार्थी आणि नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. गराध्यक्ष करण ससाणे यांनी यासंदर्भात सदरील वाचनालय आणि स्पर्धा परीक्षा केंद्राचे बांधकाम तातडीने सुरू करावे, अशी मागणी शेकडो विद्यार्थ्यांनी केली आहे.



# शेतकऱ्यांना एफएसएएस ॲपवर खत मागणी नोंदणी अनिवार्य

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** महाराष्ट्रात कोल्हापूर व छत्रपती संभाजीनगर या दोनजिल्ह्यात केंद्र सरकारचा National famewoA°k foA° fetilize sale app या नावाने शेतकऱ्यांसाठी खत ऑनलाईन बुकिंग हा पथदर्शी प्रकल्प ५ जून २०२६ पासून राज्यात सुरुवात होत आहे. या संदर्भात कृषी विभागाकडून प्रचार व प्रसिद्धी सुरू आहे.सदर पमध्ये शेतकऱ्यांनीवापरून ऑनलाइन खताची बुकिंग करायची आहे. जमिनीच्या क्षेत्राचा तपशील, पिकांचा तपशील, खतांची निवड, किरकोळ खत विक्रेत्यांची निवड ही माहिती भरल्यानंतर किंवा टोकन नंबर तयार होईल. सदरचा जनरेट झाल्यापासून ३ दिवसांपर्यंत वैद्य राहणार असून टोकन नंबर संबंधित कृषी सेवा केंद्रावर दाखवल्यानंतर नोंदणी केलेले खत एझी मशीनद्वे शेतकऱ्यांना वितरित होणार आहे.ॲप हे ५ जूनपासून सुरु होणार आहे. यापुढे ऑनलाईन खत बुक केल्याशिवाय खत विक्री होणार नाही. यासाठी कृषी विभागामार्फत तालुका कृषी अधिकारी बापूराव जायभाये, पंचायत समिती कृषी अधिकारी अजय गवळी,गुण नियंत्रण प्राजक्ता रमणसिंग यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक कृषी अधिकारी, उपकृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी, कृषी मित्र व कृषी सेवा केंद्र मार्फत मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांना खत बाबत अवगत करण्याविषयी प्रचार व प्रसिद्धीचे काम करण्यात येत आहे. तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांना सदरचे प डाऊनलोड करून वापर करण्याचे आवाहन तालूका कृषी अधिकारी बापूराव जायभाये व कृषी अधिकारी अजय गवळी प्राजक्ता रमणसिंग यांनी केले आहे.

> एफएसएएस ॲपवरील नोंदणी ही केवळ औपचारिकता नसून खत वितरण अधिक पारदर्शक, अचूक आणि शेतकरीकेंद्रित करण्यासाठीचा महत्त्वाचा टप्पा आहे. त्यामुळे प्रत्येक पात्र शेतकऱ्याने स्वतःची मागणी वेळेत नोंदवून ठेवावी. ॲप वापरताना किंवा नोंदणी प्रक्रियेत कोणतीही अडचण आल्यास कृषी विभाग, पंचायत समिती गंगापूर अथवा तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी त्वरित संपर्क साधावा,
>
> **सुहास वाकचौरे**
> **गटविकास अधिकारी पंचायत समिती गंगापूर,**

> खरीप हंगामात खतांची उपलब्धता सुरळीत राहावी, शेतकऱ्यांना वेळेवर आवश्यक खत मिळावे आणि अनावश्यक गैरसोय टळावी यासाठी शासनाने ही डिजिटल व्यवस्था सुरू केली आहे.शेतकऱ्यांनी शेवटच्या क्षणाची वाट न पाहता आगाऊ नोंदणी करून खत नियोजनात सहकार्य करावे, शेतकऱ्यांच्या सोयीसाठी नियोजनबद्धव्यवस्था करण्यात आली आहे.
>
> **कविता रविंद्र चव्हाण**
> **सभापती पंचायत समिती गंगापूर,**

# पुणतांब्याच्या विकासासाठी तीस वर्षानंतर भरीव निधी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणतांबा :** महाराष्ट्राची दक्षिण काशी समजल्या जाणाऱ्या श्री क्षेत्र पुणतांबा गावाच्या विकासासाठी तीस वर्षानंतर भरीव निधी देण्याची घोषणा करण्यात आली. त्यामुळे ग्रामस्थामध्ये समाधानाचे वातावरण पसरले आहे. श्री क्षेत्र येथे १९ ऑगष्ट ते २६ ऑगष्ट १९९६ मध्ये ब्रम्हलीन गंगागिरी महाराज १४९० या नाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. २६ ऑगष्ट १९९६ रोजी राज्याचे तत्कालीक उपमुख्यमंत्री गोपीनाथ मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत सप्ताहाचा सांगता समारोह झाला होता. यावेळी कै मुंडे पुणतांब्यांचा तीर्थस्थळ योजनेच्या विकास आराखडयात समावेश करून ७५ लाख निधी मंजूर केल्याची घोषणा केली होती. काही कालावधीनंतर आणखी २५ लाखाचा निधी उपलब्ध करून दिला होता. या निधीतून थोडीफार कामे झाली होती. त्यानंतर अहिल्यानगर जिल्हयाचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी तीन दिवसापूर्वी पुण्यश्लेक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात घाट व मंदिर दुरुस्तीसाठी साडेतीन कोटीचा निधी उपलब्ध देण्यात येईल अशी घोषणा केली.

या निधीमुळे तीर्थस्थळाचा विकास होण्यास मदत होणार आहे. माजी आ. स्नेहलता कोल्हे व आ. विवेक कोल्हे हे सुध्दा पुणतांब्यांचा विकास करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करत आहेत. त्यामुळे या तीर्थस्थळाचा विकासाचा मार्ग मोकळा झाला आहे निधीतून केवळ घाट व मंदिरांच्या दुरुस्तीबरोबरच गावासाठी बांधलेल्या संपूर्ण तटबंदी व वेशींची सुध्दा दुरुस्ती करण्याची गरज असल्याची भावना अनेक ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

# जमिनीचे आरोग्य सुधारण्यासाठी जैविक व सेंद्रिय खतांचा वापर गरजेचा : डॉ. विलास खर्चे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी ;** शेतीमधील वाढत्या उत्पादन खर्चामुळे आणि रासायनिक खतांच्या अतिवापरामुळे जमिनीचे आरोग्य खालावत असून उत्पादकतेवर त्याचा परिणाम होत आहे. त्यामुळे संतुलित खत व्यवस्थापनासोबत जैविक व सेंद्रिय खतांचा वापर वाढविणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांनी केले.

महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी आणि महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विभागीय संशोधन व विस्तार सल्लागार समितीच्या खरीप २०२६ बैठकीत ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. ही बैठक ऑनलाइन व ऑफलाइन पद्धतीने पार पडली. यावेळी महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेचे महासंचालक राहुल महिवाल, कृषी आयुक्त सूरज मांढरे, पशुसंवर्धन आयुक्त किरण पाटील, विस्तार व प्रशिक्षण संचालक रफिक नाईकवडी यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व शास्त्रज्ञ उपस्थित होते.

डॉ. खर्चे म्हणाले की, येत्या खरीप हंगामात एल निनोच्या प्रभावामुळे पर्जन्यमान कमी राहण्याची शक्यता लक्षात घेता विद्यापीठाने तयार केलेली आपत्कालीन पीक नियोजन पुस्तिका शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे. नैसर्गिक शेतीला चालना देण्यासाठी आवश्यक निविष्ठा निर्मितीलाही प्रोत्साहन देण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील दहा जिल्ह्यांमध्ये जून महिन्यात 'खेत बचाओ अभियान' राबविण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

बैठकीत खरीप हंगामाचे नियोजन, हवामान आधारित शेती, कडधान्य व सोयाबीन उत्पादन तंत्रज्ञान, कापूस पीक व्यवस्थापन, कीड व रोग नियंत्रण, नैसर्गिक शेती तसेच बियाणे उपलब्धता यासंदर्भात विविध तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते 'आपत्कालीन पीक नियोजन' या पुस्तिकेचे विमोचन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विजय शेलार यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. आनंद चवई यांनी तर आभार डॉ. सचिन सदाफळ यांनी मानले.

# स्मशानभूमीसाठी जागा द्या ; अन्यथा उपोषण

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** राहुरी तालुक्यातील तांदुळवाडी येथील नवयुग कॉलनी नवीन गावठाण परिसरात हिंदू स्मशानभूमी व मुस्लिम दफनभूमीसाठी तातडीने जागा उपलब्ध करून द्यावी, अन्यथा ग्रामस्थांसह बेमुदत आमरण उपोषणास बसण्याचा इशारा तांदुळवाडी ग्रामपंचायतीचे ज्येष्ठ सदस्य निसारभाई सय्यद, सदस्या सौ. शितल भैय्यासाहेब आढाव तसेच नवयुग कॉलनी गावठाण येथील ग्रामस्थांनी दिला आहे.

याबाबत तहसीलदार राहुरी यांच्या मार्फत जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांना निवेदन देण्यात आले असून निवेदनाच्या प्रती पोलीस निरीक्षक राहुरी, गटविकास अधिकारी पंचायत समिती राहुरी तसेच राहुरीचे आमदार अक्षय शिवाजीराव कर्डिले यांनाही देण्यात आल्या आहेत.

निवेदनात म्हटले आहे की, मौजे तांदुळवाडी हद्दीतील नवयुग कॉलनी गावठाण या प्रभागात सुमारे १६०० ते १७०० नागरिक वास्तव्यास आहेत. मात्र या परिसरात स्वतंत्र हिंदू स्मशानभूमी नसल्याने अंत्यसंस्कारासाठी



नागरिकांना ४ ते ५ किलोमीटर अंतरावरील ठिकाणी जावे लागते. तसेच तांदुळवाडी गावात सुमारे ७५ मुस्लिम कुटुंबे वास्तव्यास असून दफनभूमीची व्यवस्था नसल्याने त्यांनाही दफनविधीसाठी ७ ते ८ किलोमीटर दूर जावे लागत आहे. त्यामुळे दोन्ही समाजांच्या नागरिकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

हिंदू स्मशानभूमी व मुस्लिम दफनभूमीसाठी शासकीय गट क्रमांक ६८२ मध्ये पुरेशी जागा उपलब्ध असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले आहे. याबाबत तांदुळवाडी ग्रामपंचायतीने ग्रामसभा तसेच मासिक बैठकीत ठराव मंजूर करून तहसीलदार राहुरी, गटविकास अधिकारी पंचायत समिती राहुरी आदींकडे प्रस्ताव सादर केले आहेत. तसेच मंडलाधिकारी व तलाठी यांच्या मार्फत जागेची पाहणी करून पंचनामेही करण्यात आले आहेत. मात्र त्यानंतरही संबंधित प्रशासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

प्रशासनाने या मागणीची तातडीने दखल घेऊन हिंदू स्मशानभूमी व मुस्लिम दफनभूमीसाठी जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी निवेदनाद्वे करण्यात आली आहे. अन्यथा ग्रामस्थांसह राहुरी तहसील कार्यालयासमोर दिनांक २३ जून २०२६ पासून बेमुदत आमरण उपोषण सुरू करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे.

यावेळी ज्येष्ठ सदस्य निसार सय्यद यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य शिवाजी खडके, माजी सैनिक भैय्यासाहेब आढाव, पत्रकार विनीत धसाळ, सचिन शेटे, शंकर लष्करे, आमिन पठाण, प्रवीण जाधव, अविनाश पेरणे, प्रमोद खडके, नितीन मकासरे, काशिम शेख, ज्ञानदेव पुंड, विशाल ठोंबे, लखन गायकवाड, बाबासाहेब जाधव आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

# पाण्याच्या वादातून कुऱ्हाडीने हल्ला

## दोघांविरुद्ध गुन्हा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनई :** नेवासा तालुक्यातील लोहगाव शिवारात पाण्याच्या वादातून एका शेतकऱ्यावर कुऱ्हाडीच्या दांड्याने हल्ला करून जखमी केल्याची घटना घडली. याप्रकरणी सोनई पोलिस ठाण्यात दोन जणांविरुद्ध मारहाण, दुखापत व जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, लोहगाव शिवारातील रहिवासी व शेतकरी सचिन जालिंदर तनपुरे (वय २७) यांनी याबाबत फिर्याद दिली आहे. त्यानुसार, ३१ मे रोजी सायंकाळी ४ वाजण्याच्या सुमारास त्यांच्या घरासमोर ही घटना घडली.

फिर्यादी सचिन तनपुरे यांनी आपल्या शेतातील पाण्याची मोटार सुरू केली असता, त्याठिकाणी आरोपी हिराबाई शिवाजी तनपुरे व मिनीनाथ तनपुरे हे आले. यावेळी पाण्याच्या वापराबाबत दोन्ही बाजूंमध्ये वाद झाला. वादाचे रूपांतर हाणामारीत झाले, आरोपींनी फिर्यादीला शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

त्यानंतर आरोपींपैकी एकाने फिर्यादीचा हात धरून ठेवला, तर दुसऱ्या आरोपीने हातातील कुऱ्हाडीच्या दांड्याने मारहाण करून जखमी केल्याचे




फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. तसेच, ''पुन्हा आमच्या नादी लागलास तर तुला जीवे मारून टाकू,'' अशी धमकीही दिल्याचा आरोप आहे.

जखमी सचिन तनपुरे यांच्यावर विखे पाटील मेमोरियल हॉस्पिटल, विळदघाट (अहिल्यानगर) येथे उपचार सुरू आहेत. वैद्यकीय अहवाल व फिर्यादीच्या जबाबाच्या आधारे सोनई पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक २५६/२०२६ दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी भारतीय न्याय संहिता (इछड) अंतर्गत कलम ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२) (३) व ३(५) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार बी.जी. बाचकर हे करीत आहेत

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

दखल

## नागेबाबा मल्टीस्टेटकडून दहावी व बारावीतील गुणवंताचा सत्कार



**बालाजी देडगाव** : नागेबाबा मल्टीस्टेटचे संस्थापक चेअरमन कडूभाऊ काळे यांच्या मार्गदर्शनाखाली बालाजी देडगाव येथील इयत्ता दहावी व बारावी उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी देडगाव केंद्र शाळेचे केंद्रप्रमुख भास्कर तांबे होते. मान्यवरांच्या हस्ते दहावी-बारावी गुणवंत विद्यार्थ्यांना पुस्तक भेट देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी चाइल्ड करिअर इंग्लिश मीडियम स्कूलचे संस्थापक अध्यक्ष सागर बनसोडे, अहिल्याबाई होळकर माध्यमिक विद्यालयाचे प्रवीण मुंगसे, अनिल पेटे, ज्येष्ठ पत्रकार बन्सीभाऊ एडके, प्रगतशील शेतकरी चांगदेव तांबे, आकाश चेडे, पाटीलबा कदम, जालिंदर वांढेकर, संभाजी होंडे, बबन कुटे, बाजीराव मुंगसे, संजय कोकरे, मोहन धायगुडे, प्रल्हाद मुंगसे, विद्यार्थी व पालक, कॅशियर योगेश भारती, राहुल मुंगसे, सभासद व खातेदार उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार युनूस पठाण यांनी केले. शाखाधिकारी पांडुरंग एडके यांनी आभार मानले.

## सुकळे परिवाराच्यावतीने अनाथ आश्रामास किराणा साहित्य वाटप

**श्रीरामपूर** : तालुक्यातील इंदिरानगर येथील कृष्णानंद बाल अनाथ आश्रमास अनाथ बालकांना सुकले व बुरकुले परिवाराच्यावतीने किराणा वाटप करण्यात आले. यावेळी सुकळे यांचे कार्य समाजाला खरोखर आदर्श व प्रेरणादायी ठरेल असा विश्वास माजी प्रा. सुभाष लिंगायत यांनी व्यक्त केले.यावेळी भागवत मुठे, डॉ. संगिता फासाटे, कृष्णानंद महाराज या मान्यवरांचा विविध क्षेत्रातील शाल श्रीफळ देऊन सुखदेव सुकळे यांनी सत्कार केला.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुरेखा उरकुले, संजय बुरकुले, संकेत बुरकुले, सुयोग बुरकुले आदीनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्राध्यापक बाबुराव उपाध्ये यांनी केले. प्रास्ताविक शितल सुकळे यांनी आभार मानले.

## निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळाच्या उपाध्यक्षपदी डॉ. अनिल लोखंडे



**झरेकाठी** : निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळाच्या उपाध्यक्षपदी सेवानिवृत्त मुख्याध्यापक डॉ. अनिल लोखंडे यांची सन २०२६ ते २०२९ या तीन वर्षांच्या कालावधीसाठी निवड करण्यात आली आहे. पर्यावरण संवर्धन क्षेत्रात राज्यभर कार्यरत असलेल्या या संस्थेचे मार्गदर्शन ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे करीत आहेत.

डॉ. लोखंडे यांनी संस्थेत सदस्य, राज्य संघटक तसेच सचिव (कार्य व नियोजन) म्हणून अनेक वर्षे उल्लेखनीय काम केले आहे. वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन, सीडबॉल निर्मिती, प्लास्टिक निर्मूलन, नदी-नाले स्वच्छता, पर्यावरण जनजागृती आणि मुक्या पशुपक्ष्यांसाठी 'मूठभर चारा व घोटभर पाणी' यांसारख्या उपक्रमांत त्यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत संस्थेचे अध्यक्ष प्रमोद मोरे यांनी ही नियुक्ती जाहीर केली. जागतिक पर्यावरण दिन व स्व. आबासाहेब मोरे स्मृतिदिनानिमित्त ५ जून रोजी राळेगणसिद्धी येथे आयोजित कार्यक्रमात डॉ. लोखंडे यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात येणार असून, त्यांच्या सेवापूर्तीनिमित्त सपत्निक सत्कारही होणार आहे. त्यांच्या निवडीबद्दल विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

## चांदा-रस्तापूर मार्गावर बिबट्याचा पुन्हा हल्ला

**चांदा** : नेवासा तालुक्यातील चांदा-रस्तापूर रस्त्यालगत असलेल्या वामन वस्तीवर बिबट्याने एका शेळीची शिकार केल्याची घटना घडली असून परिसरातील शेतकरी व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या भागात यापूर्वीही बिबट्याने अनेक शेळ्या व कुत्र्यांवर हल्ले केल्याच्या घटना घडल्या आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, गट क्रमांक २८१ मधील वस्तीवर राहणारे आदिनाथ अर्जुन वामन यांच्या घरासमोर कंपाऊंडच्या आत बांधलेल्या शेळीवर बिबट्याने रात्रीच्या सुमारास हल्ला केला.

रात्री सुमारे दोन वाजण्याच्या दरम्यान शेळी ओरडल्याचा आवाज ऐकून आदिनाथ वामन यांनी वस्तीकडे धाव घेतली. त्यावेळी बॅटरीच्या प्रकाशात त्यांना बिबट्या दिसल्याचे सांगितले जाते. वामन यांनी आरडाओरडा केल्यानंतर परिसरातील शेतकरी जागे झाले. काहींनी बॅटरीचा प्रकाश टाकल्यावर बिबट्या शेळीची शिकार करून घटनास्थळावरून पसार झाला. या घटनेनंतर वामन यांनी शेतातील पाणी देण्याचे काम थांबवून परिसरातील नागरिकांना सतर्क केले. दरम्यान, या भागात बिबट्याचा वारंवार वावर वाढल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. वन विभागाने तातडीने उपाययोजना करून बिबट्याचा बंदोबस्त करावा व नागरिकांना या दहशतीतून मुक्त करावे, अशी मागणी स्थानिक शेतकऱ्यांनी केली आहे.

# आश्वी परिसरात वृक्षतोडीचा धुमाकूळ!

## मौल्यवान झाडांची राजरोस कत्तल; वन विभागाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी** : प्रवरा नदी त्या नदीवर दोन कालवे आणि निळवंडे धरणाच्या दोन कालव्यांमुळे सदैव हिरवागार आणि समृद्ध राहिलेला आश्वीचा बागायती पट्टा सध्या एका वेगळ्याच कारणाने होरपळत आहे. परिसरात सध्या मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर वृक्षतोड सुरू असून, वर्षानुवर्षे उभी असलेली मौल्यवान झाडे काही मिनिटांत भुईसपाट केली जात आहेत. या संपूर्ण 'लाकूड बाजारा'मागे मोठे आर्थिक रॅकेट सक्रिय असल्याची चर्चा असून, वन विभागाच्या संशयास्पद भूमिकेवर आता पर्यावरणप्रेमींनी थेट बोट ठेवले आहे.



**आधुनिक यंत्रांनी मिनिटांत कत्तल; मोठ्या शहरांकडे वाहतूक**

ग्रामस्थांनी दिलेल्या माहितीनुसार, लिंब, चिंच, जांभूळ यांसारख्या पिढ्यानपिढ्या जतन केलेल्या मौल्यवान वृक्षांना लक्ष्य केले जात आहे. आधुनिक कटर आणि यंत्रसामग्रीच्या सहाय्याने अवघ्या काही मिनिटांत ही झाडे तोडली जातात. भरदिवसा लाकडाने गच्च भरलेली वाहने आश्वी परिसरातून बाहेर पडत असून, ही लाकडे थेट मोठ्या शहरांतील बाजारपेठेत पाठवली जात आहेत. हे सर्व सुरू असतानाही संबंधित यंत्रणा डोळे झाकून का बसली आहे? असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत.

**वादळात पडलेल्या झाडांचे गौडबंगाल काय?**

मागील महिन्यात झालेल्या वादळामुळे सार्वजनिक बांधकाम विभाग, पाटबंधारे विभाग आणि इतर शासकीय जागांवरील अनेक जुनी झाडे उन्मळून पडली होती. नियमानुसार या पडलेल्या झाडांचा सविस्तर पंचनामा आणि शासकीय नोंद होणे गरजेचे होते. मात्र, या लाकडाची विल्हेवाट नेमकी कशी लावली गेली? याची कोणतीही पारदर्शक माहिती समोर आलेली नाही. यामध्ये मोठी अनियमितता झाल्याचा दाट संशय ग्रामस्थांकडून व्यक्त केला जात आहे.

**कोट्यवधींच्या वृक्षारोपणाला 'सुरुंग'**

एकीकडे राज्य शासन पर्यावरण संतुलनासाठी आणि वृक्षारोपणासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी पाणीसारखा वाहत आहे. 'झाडे लावा, झाडे जगवा'च्या घोषणा दिल्या जात आहेत. मात्र, दुसरीकडे आश्वी परिसरात सुरू असलेल्या या राजरोस कत्तलीमुळे शासनाच्या मोहिमेलाच सुरुंग लागत आहे. खाजगी जमिनीवरील झाडेही कोणतीही कायदेशीर परवानगी न घेता थेट तस्करांच्या घशात घातली जात असल्याचा आरोप होत आहे.

**अधिकारी आणि तस्करांचे 'साटेलोटे'?**

या बेसुमार वृक्षतोडीमुळे परिसरात आधीच सक्रिय असलेल्या लाकूड तस्करांचे मनोबल कमालीचे वाढले आहे. वन विभाग आणि संबंधित यंत्रणेच्या नाकाखाली हा सर्व प्रकार घडत असल्याने, यात अधिकारी आणि तस्करांचे काही साटेलोटे आहे का? अशी जाहीर चर्चा आता चौकाचौकात रंगू लागली आहे.

**उच्चस्तरीय चौकशीची मागणी**

पर्यावरणाचा समतोल बिघडवणाऱ्या या गंभीर प्रकारामुळे आश्वी परिसरातील निसर्गप्रेमींमध्ये तीव्र संताप आहे. या संपूर्ण प्रकरणाची तात्काळ आणि उच्चस्तरीय चौकशी करून, या रॅकेटमधील मुख्य सूत्रधार आणि त्यांना पाठीशी घालणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी लावून धरली आहे. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही नागरिकांनी दिला आहे.

## अमृतवाहिनीच्या एमबीए विभागाला ८५ टक्के प्लेसमेंट

### ६० पैकी ५१ विद्यार्थ्यांना नोकरी




**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : अमृतवाहिनी इंजिनिअरिंग कॉलेजच्या एमबीए विभागाने यंदा ८५ टक्के प्लेसमेंटचा उल्लेखनीय टप्पा गाठला असून ६० पैकी ५१ विद्यार्थ्यांना नामांकित कंपन्यांमध्ये नोकरीची संधी मिळाली आहे. काही विद्यार्थ्यांना वार्षिक ८.५ लाख रुपयांपर्यंतच्या आकर्षक पॅकेजची ऑफर मिळाल्याने महाविद्यालयाच्या गुणवत्तापूर्ण व्यवस्थापन शिक्षणाची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे.

मार्केटिंग, फायनान्स, मानव संसाधन, माहिती तंत्रज्ञान व बिझनेस डेव्हलपमेंट या क्षेत्रांत विद्यार्थ्यांची निवड झाली असून टीसीएस, मेझॉन, एसबीआय कार्ड्स, इंडिया मार्ट, एचडीएफसी लाइफ, बजाज फायनान्स, बर्जर पेंट्स, डेटामॅटिक्स आदी कंपन्यांमध्ये त्यांना संधी मिळाली आहे. प्लेसमेंट ऑफिसर डॉ. सचिन खर्डे यांनी यासाठी विशेष प्रयत्न केले.

दरम्यान, महाविद्यालयाच्या स्टार्टअप व उबवणी केंद्राच्या माध्यमातून पाच विद्यार्थ्यांनी स्वतःचे व्यवसाय सुरू केले आहेत. विद्यार्थ्यांना उद्योजकतेसह शेअर बाजाराचे ज्ञान मिळावे यासाठी एनआयएसएम प्रमाणपत्र अभ्यासक्रमही सुरू करण्यात आला आहे. या यशाबद्दल संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य डॉ. एम. ए. वेंकटेश व विभागप्रमुख डॉ. वृषाली साबळे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

**आंतरराष्ट्रीय संधीसाठी जपानी भाषेचे प्रशिक्षण**

अमृतवाहिनीच्या विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय पातळीवर संधी उपलब्ध व्हाव्या याकरता महाविद्यालयात साकुरा जपानी लर्निंग सेंटर सुरू करण्यात आले आहे. यामधून विविध परदेशी भाषांचे प्रशिक्षण दिले जात आहे त्यामुळे विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय पातळीवर करिअरच्या नव्या संधी उपलब्ध झाले असल्याची माहिती डॉ.वृषाली साबळे यांनी दिली आहे.

## चिंचोली येथील प्रवरा फार्मसी कॉलेजला राष्ट्रीय 'एज्युकेशन एक्सलन्स अवॉर्ड'

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लोणी** : लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या चिंचोली-मोहू (ता. सिन्नर, जि. नाशिक) येथील कॉलेज ऑफ फार्मसी (डी. फार्मसी व बी. फार्मसी) या महाविद्यालयाला राष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठेचा 'एज्युकेशन एक्सलन्स अवॉर्ड २०२६' प्राप्त झाला आहे. अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय तांबे यांनी दिली. बेंगळुरू येथील इंडिया इलाईट एज्युकेशन अँड इन्स्टिट्यूट एक्सलन्स अवॉर्ड तसेच बिगिनअप संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.




शिक्षण क्षेत्रातील गुणवत्ता, उत्कृष्ट प्रशासन, समाजाभिमुख कार्य आणि विद्यार्थीकेंद्री उपक्रमांच्या आधारे महाविद्यालयाची 'ट्रस्टेड अँड आऊटस्टँडिंग फार्मसी कॉलेज ऑफ द इयर २०२६ - महाराष्ट्र' म्हणून निवड करण्यात आली. महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्ता, आधुनिक शैक्षणिक सुविधा, संशोधनाला प्रोत्साहन, विद्यार्थी विकासासाठी राबविण्यात येणारे विविध उपक्रम तसेच समाजोपयोगी कार्याची दखल सन्माननीय परीक्षक मंडळाने घेतली.

त्यानंतर महाविद्यालयाला हा राष्ट्रीय सन्मान जाहीर करण्यात आला. बेंगळुरू येथे नुकत्याच पार पडलेल्या दिमाखदार पुरस्कार सोहळ्यात महाविद्यालयाला हा सन्मान प्रदान करण्यात आला.

## काष्टी जवळ अपघात दोघे गंभीर जखमी; इंडिका चालक फरार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा** : श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी येथील दांगट मळा परिसरात भरधाव वेगाने जाणाऱ्या टाटा इंडिका आणि दुचाकी यांच्यात झालेल्या भीषण अपघातात दोन युवक गंभीर जखमी झाले आहे . जखमी दोघांवर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. अपघातानंतर इंडिका चालक घटनास्थळावरून फरार झाल्याने परिसरात संताप व्यक्त होत आहे.






मिळालेल्या माहितीनुसार, हिरो कंपनीची पॅशन प्रो दुचाकी क्रमांक चक१६ उग ८९४३ ला टाटा इंडिका क्रमांक चक२३ ए ६५६६ ने जोरदार धडक दिली. या अपघातात सनी नामदेव सावंत (रा. लिंपणगाव) हा गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर पुण्यातील ससून रुग्णालयात आयसीयूमध्ये उपचार सुरू आहेत. त्याची प्रकृती अत्यंत चिंताजनक असल्याचे सांगण्यात येत आहे.

तसेच मानव प्रकाश शिंदे (रा. लिंपणगाव) हाही गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर दौंड येथील पिरॅमिड हॉस्पिटलमध्ये आयसीयूमध्ये उपचार सुरू आहेत.दरम्यान, अपघातास कारणीभूत ठरलेल्या टाटा इंडिकाचा चालक ढोबळे सुनील सत्यवान हा अपघातानंतर वाहन सोडून फरार झाल्याची माहिती समोर आली आहे.

घटनेनंतर काष्टी परिसरात मोठी खळबळ उडाली असून पोलिसांकडून चालकाचा शोध सुरू असल्याची चर्चा आहे. रस्ता रक्ताने लाल झाला, पण चालकाने जबाबदारीऐवजी पळ काढला, अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांमधून उमटत आहेत.

## श्रीरामपूर-नेवासा राज्यमार्गालगत अवैध वृक्षतोड

### दोषींवर कारवाईची मागणी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : श्रीरामपूर-नेवासा राज्यमार्ग क्र. ५० लगत मोठ्या प्रमाणात अवैध वृक्षतोड व वृक्ष जाळण्याचे प्रकार उघडकीस आले असून याप्रकरणी तात्काळ चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी भारतीय जनता पक्षाचे सोशल मीडिया सेलचे संयोजक संदीप आसने यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे केली आहे. संदीप आसने यांनी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, श्रीरामपूर ते नेवासा राज्यमार्गालगत अनेक वर्षांपासून वटवृक्षांसह विविध प्रजातींची घनदाट झाडी अस्तित्वात होती.

सामाजिक वनीकरण विभागामार्फत लावण्यात आलेली ही झाडे पर्यावरण संवर्धन व जैवविविधतेसाठी अत्यंत महत्त्वाची आहेत. मात्र, अशोक नगर फाटा ते पुनतगांव फाटा दरम्यान, विशेषतः वडाळा शिवार परिसरात काही नागरिक व शेतकऱ्यांनी व्यावसायिक उद्देशाने जागा निर्माण करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या हद्दीतील झाडांची बेकायदेशीर तोड केली असून अनेक झाडांना रात्रीच्या वेळी आग लावून नष्ट करण्यात आल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. यामध्ये वटवृक्ष व काशीद यांसारख्या मौल्यवान वृक्षांची मोठ्या प्रमाणात कत्तल झाल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

ही बाब महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) वृक्ष संरक्षण व संवर्धन अधिनियम, १९७५ तसेच सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान व पर्यावरण हानीसंदर्भातील कायद्यांनुसार गंभीर आणि दंडनीय असल्याचे आसने यांनी म्हटले आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात वृक्षतोड होत असताना संबंधित विभागाकडून कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याबद्दल त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. राज्य शासन एकीकडे वृक्षलागवडीच्या विविध मोहिमा राबवत असताना दुसरीकडे अस्तित्वातील वृक्षांची मोठ्या प्रमाणात कत्तल होत असल्याकडे दुर्लक्ष होत असल्याची खंत व्यक्त करत, शासनाच्या पर्यावरणपूरक धोरणालाच यामुळे हरताळ फासला जात असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.

या प्रकरणाची तात्काळ चौकशी करून वृक्षतोडीस जबाबदार असलेल्या व्यक्तींची ओळख पटवावी, त्यांच्याविरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल करावेत, पुढील वृक्षतोड रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात तसेच संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून आवश्यक कारवाई करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. दरम्यान, जळत असलेल्या व जाळण्यात आलेल्या झाडांची छायाचित्रेही निवेदनासोबत जोडण्यात आली असून या गंभीर प्रकरणाची दखल घेऊन प्रशासनाने तातडीने पावले उचलावीत, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

## प्रवरा रुरल इंजिनियरिंग कॉलेजच्या आणखी दोन शाखांना एनबीए मानांकन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर** : ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार अभियांत्रिकी शिक्षण उपलब्ध करून देणाऱ्या प्रवरा रुरल इंजिनियरिंग कॉलेजने शैक्षणिक गुणवत्तेचा आणखी एक मानाचा टप्पा गाठला आहे. महाविद्यालयातील मेकॅनिकल इंजिनिअरिंग आणि इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी या दोन अभ्यासक्रमांना नॅशनल बोर्ड ऑफ क्रिडेशन (एनबीए) मानांकन प्राप्त झाले आहे. यामुळे महाविद्यालयाच्या एनबीए मानांकित शाखांची संख्या सातवर पोहोचली आहे. यापूर्वी इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन, इन्स्ट्रुमेंटेशन अँड कंट्रोल, सिव्हिल, केमिकल आणि कॉम्प्युटर इंजिनिअरिंग या पाच शाखांना एनबीए मानांकन मिळाले होते.


तसेच काही महिन्यांपूर्वीच महाविद्यालयाला 'ए' दर्जाचे नॅक मानांकनही प्राप्त झाले आहे. एनबीएच्या तज्ज्ञ पथकाने २६ ते २८ एप्रिल २०२६ दरम्यान महाविद्यालयाची सखोल पाहणी करून शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन, प्रयोगशाळा, उद्योगसहभाग आणि पायाभूत सुविधांचे मूल्यमापन केले. त्यानंतर दोन्ही शाखांना मानांकन प्रदान करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय गुल्हाने यांनी हे यश गुणवत्तापूर्ण व उद्योगाभिमुख शिक्षणाची पावती असल्याचे सांगितले. समन्वयक डॉ. चंद्रकांत कडू यांनी शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी व पालकांच्या सामूहिक प्रयत्नांमुळे हे यश मिळाल्याचे नमूद केले.

## शनिशिंगणापूरमध्ये भाविकांची लूट? एजंटांच्या मनमानीमुळे नाराजी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनई** : जागतिक कीर्तीचे तीर्थक्षेत्र असलेल्या शनिशिंगणापूर येथे दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची काही एजंटांकडून आर्थिक पिळवणूक होत असल्याच्या तक्रारी पुढे येत आहेत. अधिक मासानिमित्त देशभरातून मोठ्या संख्येने भाविक शनिदर्शनासाठी येत असून, या गर्दीचा फायदा घेत पूजेचे साहित्य व अन्य वस्तू चढ्या दराने विकून भाविकांची लूट होत असल्याचा आरोप केला जात आहे.

स्थानिक स्तरावर याबाबत वेळोवेळी तक्रारी व वृत्तप्रसिद्धी होत असली तरी परिस्थितीत फारसा बदल झालेला नसल्याचे भाविकांचे म्हणणे आहे. मंदिर परिसरात श्रद्धेच्या नावाखाली सुरू असलेल्या या प्रकारांवर नियंत्रण आणण्यासाठी देवस्थान व प्रशासनाने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.




दरम्यान, शनिश्वर देवस्थानच्या वतीने भाविकांसाठी अल्प दरात उपलब्ध असलेले अन्नछत्र भोजनालय गेल्या काही महिन्यांपासून बंद असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे अनेक भाविकांना भोजन सुविधेपासून वंचित राहावे लागत असून नाराजी व्यक्त केली जात आहे.

याशिवाय, भुयारी दर्शनमार्गावरील पिण्याच्या पाण्याच्या सुविधाही अपुऱ्या असल्याची तक्रार आहे. ठिकठिकाणी बसविण्यात आलेले वॉटर फिल्टर बंद अवस्थेत असल्याने कडक उन्हाळ्यात भाविकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. या सर्व बाबींकडे प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन आवश्यक सुधारणा कराव्यात, अशी मागणी भाविकांकडून होत आहे.

## हनुमंतगावच्या स्वस्त धान्य दुकानात गैरव्यवहाराचा आरोप

### ग्रामस्थांचा आमरण उपोषणाचा इशारा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी** : राहाता तालुक्यातील हनुमंतगाव येथील स्वस्त धान्य दुकानात गेल्या पाच महिन्यांपासून धान्य वितरणात अनियमितता व काळाबाजार होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

या प्रकरणाची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करावी, अन्यथा तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

विकास फणसे, भास्कर फणसे, बाळासाहेब गावडे, नितीन हारदे यांच्यासह काही ग्रामस्थांनी स्वस्त धान्य दुकानाला भेट देऊन धान्य वितरणाची माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला. यावेळी स्टॉक रजिस्टर, तक्रार नोंदवही तसेच इतर आवश्यक नोंदी उपलब्ध करून देण्यात आल्या नसल्याचा दावा ग्रामस्थांनी केला आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, लाभार्थ्यांचे बोटांचे ठसे व ओटीपी घेऊन त्यांच्या नावावर धान्याचे बिल काढले जात आहे; मात्र प्रत्यक्षात धान्य मिळत नसल्याची तक्रार आहे.

काही लाभार्थ्यांची बिले काढून ती फेकून दिल्याचेही ग्रामस्थांनी म्हटले असून, यासंदर्भातील व्हिडिओ चित्रीकरण केल्याचा दावा करण्यात आला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी, जिल्हा पुरवठा अधिकारी, तहसीलदार व तालुका पुरवठा अधिकारी यांच्याकडे केली आहे.


## जाहीर नोटीस

अॅड. आर.यु.पागीरे

निशाणी नं. ७
नेमलेली ता.०२.०७.२०२६

नेवासा येथील मे. दिवाणी न्यायाधिश साहेब व. स्तर यांचे कोर्टात
वारस चौकशी अर्ज नं. ६४/२०२६

**अर्जदार**

१. मधुकर यादव बेल्हेकर वय ७५ वर्षे,
२. राजेंद्र मधुकर बेल्हेकर वय ४८ वर्षे,
३. बाबासाहेब मधुकर बेल्हेकर वय ४५ वर्षे, सर्वांचा धंदा शेती, सर्व रा. सोनई, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर

**सामनेवाला**

कोणीही नाही.
१. मयत नामे- चंद्रकला मधुकर बेल्हेकर मयत दि. ०९.०६.२०१४
२. मयत नामे- पद्माकर यादव बेल्हेकर मयत दि. २०.१०.२००७
३. मयत नामे - सटवाजी यादव बेल्हेकर मयत दि. १७.०७.२००२
४. मयत नामे- इंदिराबाई यादव बेल्हेकर मयत दि. ०९.१०.१९८४

वरील अर्जदार यांनी न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता वारस चौकशी अर्ज नं.६४/२०२६ दाखल केलेला आहे. मयत चंद्रकला मधुकर बेल्हेकर हे अर्जदार नं. १ ची पत्नी व अर्जदार नं. २ व ३ यांची आई आहे. तसेच मयत पद्माकर यादव बेल्हेकर हे अर्जदार नं. १ यांचे भाऊ व अर्जदार नं. २ व ३ यांचे चुलते आहे. मयत सटवाजी यादव बेल्हेकर हे अर्जदार नं. १ यांचे भाऊ व अर्जदार नं. २ व ३ यांचे चुलते आहे. मयत इंदिराबाई यादव बेल्हेकर हे अर्जदार नं. १ यांची आई व अर्जदार नं. २ व ३ यांची आजी आहे. याप्रमाणे अर्जदार व मयताचा नातेसंबंध आहे. मयतास अर्जदार यांचे व्यतिरीक्त कोणीही वारस नाही. तसेच मयत चंद्रकला मधुकर बेल्हेकर ह्या दि.०९.०६.२०१४ रोजी मयत झालेल्या आहे. तसेच पद्माकर यादव बेल्हेकर हे दि.२०.१०.२००७ रोजी मयत झालेले आहे. तसेच सटवाजी यादव बेल्हेकर हे दि.१७.०७.२००२ रोजी मयत झालेले आहे. तसेच इंदिराबाई यादव बेल्हेकर हे दि.०९.१०.१९८४ रोजी मयत झालेल्या आहे. मयत पद्माकर यादव बेल्हेकर व सटवाजी यादव बेल्हेकर हे अर्जदार नं.१ यांचे भाऊ असुन त्यांचा विवाह झालेला नाही. त्यांना अर्जदार हेच कायदेशिर वारस आहे. वर नमुद मयत यांचा धार्मिक विधी हा अर्जदार यांनीच केलेला आहे. मयत चंद्रकला मधुकर बेल्हेकर, मयत पद्माकर यादव बेल्हेकर, मयत सटवाजी यादव बेल्हेकर, मधुकर यादव बेल्हेकर व मयत इंदिराबाई यादव बेल्हेकर यांचे नावे मौजे गणेशवाडी, ता. नेवासा येथे ग्रामपंचायत मिळकत नंबर १३२ व १३३ या सामाईक नावावरील मिळकती आहे. सदर मिळकतीस अर्जदार यांचे शिवाय इतर कोणीही वारस नसुन अर्जदार हेच वारस असल्यामुळे तसे वारसप्रमाणे मिळणेकामी या न्यायालयात सदरचा वारस चौकशी अर्ज दाखल केलेला आहे.

तरी सदर अर्जदार हे सदर मयताचे वारस नाही अगर वारस नोंदी बाबत तक्रारी, हरकती असे कोणाचे काही म्हणने असल्यास तसेच सदर अर्जावर कोणाची हरकत असल्यास सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासुन एक महिन्याच्या आत किंवा दि.०२.०७.२०२६ पर्यंत स्वतः किंवा वकिला मार्फत हजर होवुन हरकती दाखल कराव्यात. सदर वारस चौकशी अर्जावर हरकती प्राप्त न झाल्यास वारसाबाबत काही एक म्हणने नाही असे समजुन मे. कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लगेच पुरावा घेऊन मयत यांचे अर्जदार हेच वारस असल्याचे प्रमाणपत्र अर्जदाराचे लाभात देण्याचे आदेश करतील.

आज दि. ०२.०६.२०२६ रोजी माझी सही निशाणी व न्यायालयाचे शिक्यानिशी दिले असे.
पुढील नेमलेली तारीख - ०२.०७.२०२६

**कनिष्ठ लिपीक**
**दिवानी न्यायालय क. स्तर**
**नेवासा**

शिक्का

**आदेशावरुन**
**सहा.अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क स्तर**
**नेवासा**

## पान १ वरुन

### प्राजक्त तनपुरे बिनविरोध आमदार

प्रयत्न निर्णायक ठरल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षाचा उमेदवार बिनविरोध निवडून आणण्याची जबाबदारी त्यांनी प्रभावीपणे पार पाडल्याचे मानले जात आहे. यापूर्वी विधानसभा निवडणुकीच्या काळातही प्राजक्त तनपुरे यांना निवडणूक लढविण्यापासून परावृत्त करून अक्षय कर्डिले यांचा मार्ग मोकळा करण्यात त्यांची भूमिका महत्त्वाची ठरल्याची चर्चा होती. त्यानंतर आता विधानपरिषद निवडणूक बिनविरोध घडवून आणण्यातही त्यांचे योगदान निर्णायक ठरल्याचे बोलले जात आहे. या निकालामुळे अहिल्यानगर जिल्ह्यात भाजपची वाढती संघटनात्मक ताकद, प्रभावी राजकीय संवाद आणि सर्वपक्षीय समन्वयाची क्षमता पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे. निवडणूक बिनविरोध करून दाखविणे हे केवळ राजकीय यश नसून संघटन व्यवस्थापनाचेही उदाहरण असल्याची प्रतिक्रिया राजकीय जाणकार व्यक्त करत आहेत. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर या विजयाकडे महत्त्वपूर्ण राजकीय संदेश म्हणून पाहिले जात असून, जिल्ह्यातील भाजप-महायुतीचे वर्चस्व आणखी मजबूत झाल्याची चर्चा सुरू आहे.

### विधान परिषद निवडणुकीत महायुतीचा दबदबा!

रंगणार आहेत. नाशिक, नागपूर, सोलापूर, नांदेड, धाराशिव-लातूर-बीड, जळगाव आणि छत्रपती संभाजीनगर-जालना या मतदारसंघांकडे राज्याचे विशेष लक्ष लागले आहे. या निवडणुकीत महायुतीने बंडखोरी नियंत्रणात ठेवण्यात यश मिळवले असले, तरी काही मतदारसंघांत नाराज नेत्यांमुळे चुरशीच्या लढती होणार आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील संख्याबळ लक्षात घेता बहुतांश ठिकाणी महायुतीचे पारडे जड मानले जात असले, तरी महाविकास आघाडीनेही अनेक ठिकाणी प्रतिष्ठेची लढत उभी केली आहे.
लोकसभा, विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी राजकारणाच्या दृष्टीने या निवडणुकांचे निकाल महत्त्वाचे मानले जात असून, त्यातून राज्यातील राजकीय समीकरणांचे पुढील चित्र स्पष्ट होणार आहे.

### तृणमूलमध्ये मोठी फूट

मर्यादित राहणार नाही. आगामी काळात काही खासदारही बंडखोर गटासोबत गेल्यास तृणमूलचे राष्ट्रीय राजकारणातील महत्त्व कमी होऊ शकते. संसदेतील विरोधी आघाडीच्या गणितावरही त्याचा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.
दरम्यान, बंगालमधील या राजकीय भूकंपामुळे राष्ट्रीय स्तरावरील राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता वर्तवली जात असून, पुढील काही दिवसांतील घडामोडींवर देशाचे लक्ष लागले आहे.

# लग्नासाठी निघालेल्या वऱ्हाडाच्या टेम्पोचा भीषण अपघात २० हून अधिक जखमी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर** : वैजापूर - गंगापूर महामार्गावर घायगाव शिवारात वऱ्हाड घेऊन जाणाऱ्या टेम्पोची व आयशर ट्रकची सोबत समोर समोर धडक होऊन भीषण अपघात घडला.या अपघातानंतर वैजापूर पोलिस व याच महामार्गाने जाणाऱ्या एसआरपीएफ च्या तुकडीने जखमींना मदतकार्य सुरू केले.घटनास्थळी जेसीबी व टोविंग कारच्या सहाय्याने टेम्पोच्या चालेल्या भागातून फसलेल्या प्रवाश्यांना काढण्याचा प्रयत्न सुरू करण्यात आला.मात्र अडथळा येत असल्याने वैजापूर पोलिस ठाण्याचे जटाळे व काळे या कर्मचाऱ्यांनी तातडीने समृद्धी महामार्गावरील रेस्क्यू टीमला संपर्क साधला परिसरातील नागरिक व एस आर पी एफ पोलीस यासोबतच वैजापूर पोलीस यांनी देवदूत बनत शर्तीच्या प्रयत्नानंतर फसलेल्या जखमींना बाहेर काढण्यात यश आले. दरम्यान जखमींना वैजापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात



आले असून टेम्पोत २१ अधिक प्रवासी असल्याची प्राथमिक माहिती आहे. हे पैठणहून येवला येथे लग्नासाठी जात होते जखमींना रुग्णवाहिका चालक शुभम गायकवाड राहुल पेहरकर अल्ताफ शेख,सचिन गायकवाड,महेश बुणगे, जिल्हा परिषद सदस्य पंकज ठोंबरे,उपनगराध्यक्ष शेख रियाज शेख अकील, पप्पु लांडे यांनी तत्काळ रुग्णवाहिकेतून उपजिल्हा रुग्णालयात आणण्यासाठी यांनी मदतकार्य केले. घायगाव शिवारात वऱ्हाड घेऊन जाणाऱ्या टेम्पो क्र एम एच २० इ.जी ०१५८ व आयशर ट्रक क्र जी जे २७टी इ ५५३५ सोबत समोर समोर धडक होऊन भीषण अपघात घडला...या अपघातानंतर वैजापूर पोलिस व याच महामार्गाने जाणाऱ्या एसआरपीएफ च्या तुकडीने जखमींना मदतकार्य सुरू केले. घटनास्थळी जेसीबी व टोविंग कारच्या सहाय्याने टेम्पोच्या चेपलेल्या भागातून फसलेल्या प्रवाश्यांना काढण्याचा प्रयत्न सुरू करण्यात आला.मात्र अडथळा येत असल्याने वैजापूर पोलिस ठाण्याचे जटाळे व काळे या कर्मचाऱ्यांनी तातडीने समृद्धी महामार्गावरील रेस्क्यू टीमला संपर्क साधला परिसरातील नागरिक व एस आर पी एफ पोलीस यासोबतच वैजापूर पोलीस यांनी देवदूत बनत शर्तीच्या प्रयत्नानंतर फसलेल्या जखमींना बाहेर काढण्यात यश आले. दरम्यान जखमींना वैजापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले असून टेम्पोत २० हुन अधिक प्रवासी असल्याची प्राथमिक माहिती प्राप्त होत आहे. हे पैठणहून येवला येथे लग्नासाठी जात होते जखमींना रुग्णवाहिका चालक शुभम गायकवाड राहुल पेहरकर अल्ताफ शेख,सचिन गायकवाड,महेश बुणगे यांनी मदतकार्य केले. येथील वैजापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात प्राथमीक उपचारानंतर असुन गंभीर जखमींना संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात पाठवण्यात आले आहे.या घटनेतील सर्व जखमी पैठण तालुक्यातील पाटेगाव येथील असून जखमींची पुढील नावे प्रमाणे गणेश जाधव, अजय बाजीराव वाघ, विशाल जाधव, किसान वामन वाघ, रंजीत गुलाब वाघ, जयसिंग रतन वाघ ,राम कल्याण वाघ, ज्ञानेश्वर रूपचंद वाघ, जितेंद्र वाघ, शालिनी किशन सोनवणे, सिद्धू वाघ ,अनिल संपत वाघ ,कैलास वाघ, चेतन वाघ, सुनील वाघ, सोन्या वाघ ,संतोष वाघ, अजय सोनवणे ,अनिता वामन वाघ,सह दोन अनोळखी पुरुष अशा २१ जण जखमी झालेले आहेत जखमींना वैजापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात प्राथमिक उपचारानंतर घाटी येथील रुग्णालयात पाठवण्यात आलेले आहे जखमींवर वैजापूर येथील वैद्यकीय अधिकारी. यांनी प्राथमिक उपचारानंतर त्याना संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात पुढील उपचारासाठी पाठविण्यात आले आहे

# तुकाराम मुंढेच्या कारवाईला पाठिंबा

## भर उन्हात श्रीरामपूर-शिर्डी पदयात्रा



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वाकडी** : आयएएस अधिकारी म्हणून ओळखले जाणारे तुकाराम मुंढे नुकतेच अन्न आणि औषध प्रशासन विभागाच्या आयुक्तपदी रुजू झाले आहेत. गेल्या २१ वर्षात ही त्यांची २५ वी बदली आहे.

त्यांच्या कार्यशैलीप्रमाणे अन्न आणि औषध विभागात रुजू झाल्यानंतर त्यांनी कारवाईचा धडाका लावला आहे. प्रशासनाच्या आयुक्तपदी रुजू होताच राज्याच्या एफडीए आयुक्त तुकाराम मुंढे यांची जोरदार मोहीम राबवली जात आहे.

सोलापूर जिल्ह्यातही अन्न व औषध प्रशासन विभागानं कारवाईचा दणका दिला आहे. बहुतेक दूध संकलन केंद्रावर छापे टाकून किलो पामतेलाचा साठा, रसायन, केमिकल साठा जप्त केला आहे.

सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांच्या भेसळ मुक्त कारवाईला पाठिंबा देण्यासाठी श्रीरामपूर तालुक्यातील दत्तनगर येथील सामाजिक कार्यकर्ते अशोक लोंढे यांनी डोक्यावर भारतीय संविधान घेऊन संविधान लिहिलेले पोस्टर व तुकाराम मुंढे समर्थनार्थ असलेले पोस्टर अंगात परिधान करून भर उन्हात वाकडी मार्गे श्रीरामपूर ते शिर्डी पायी पदयात्रा केली.

वाकडी ते श्रीरामपूर रस्ता दुरुस्तीसाठी अशोक लोंढे यांनी अनेक वेळा आंदोलन केली होती. त्याच रस्त्याने लोंढे यांनी पदयात्रा करत तुकाराम मुंढे यांच्या भेसळ मुक्त कारवाईला पाठिंबा दिला आहे.

दुधाच्या आवक पेक्षा ती पटीने दूध निर्यात होत असताना अन्न व औषध प्रशासन करते काय ? असा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. लोंढे यांच्या या समाजसेवी व मानवी आरोग्याच्या दृष्टीने योग्य असलेल्या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

### सौर कृषिपंपांमध्ये गाठला देशात सर्वाधिक १० लाखांचा टप्पा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे** : सौर कृषिपंपामध्ये विश्वविक्रम करणाऱ्या महाराष्ट्रामने बुधवारी (दि. ३) देशात सर्वाधिक १० लाख सौर कृषिपंपांचा टप्पा पूर्ण केला आणि देशपातळीवर एक नवा इतिहास रचला आहे. पीएम कुसुम-बी व मागेल त्याला सौर कृषिपंप अंतर्गत महाराष्ट्राने ही ऐतिहासिक कामगिरी केली आहे. देशातील एकूण सौर कृषिपंपांपैकी तब्बल ६४ टक्के सौर पंप एकट्या महाराष्ट्रात कार्यान्वित झाले आहेत. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी या अभिमानास्पद कामगिरीमध्ये योगदान देणाऱ्या सर्वांचे अभिनंदन केले आहे.प्रधानमंत्री कुसुम-बी आणि राज्य शासनाच्या मागेल त्याला सौर कृषिपंप योजनेची महावितरणकडून प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे. ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला तसेच महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांच्या नेतृत्वात महावितरणने सौर कृषिपंपामध्ये मोठी आघाडी घेतली आहे. देशात आतापर्यंत एकूण १५ लाख ६२ हजार २८९ सौर कृषिपंप कार्यान्वित करण्यात आले आहेत. त्यापैकी तब्बल १० लाख ४७२ (६४ टक्के) एकट्या महाराष्ट्रात तर उर्वरित सर्व राज्यांमध्ये एकूण ५ लाख ६१ हजार ८१७ (३४ टक्के) कृषिपंप कार्यान्वित झाले आहेत. महाराष्ट्रानंतर हरियाणा- १ लाख ९० हजार, राजस्थान- १ लाख २७ हजार, उत्तरप्रदेश- ७१ हजार ५३८, झारखंड- ६१ हजार ४५२, गुजरात- २१ हजार ८९४ अशी क्रमवारी आहे.

## खरीप हंगाम पूर्व मेळावा जळगावात उत्साहात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर** : तालुक्यातील जळगाव येथे खरीप हंगाम पूर्व मेळावा तालुका कृषी विभागाच्या वतीने घेण्यात आला माननीय उपविभागीय कृषी अधिकारी आनंद गंजेवार व तालुका कृषी अधिकारी व्यंकट ठक्के यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यात अनेक गावांमध्ये कृषी विभागाच्या वतीने मोहिमांचे नियोजन करण्यात आले आहे.

महालगाव कृषी मंडळातील जळगाव येथे मंडळ कृषी अधिकारी माधव गांगुर्डे यांनी खरीप हंगाम पूर्व नियोजनात जमिनीची पूर्व मशागत, बियाणे व खते खरेदी करताना पक्के बिल घेणे, बीज उगवण क्षमता चाचणी बीज प्रक्रिया, सरीवरंबा वरती पेरणी, सापळा पिकांची लागवड शत्रूकिडी व मित्रकिडी, आंतर पिकांची लागवड, जैविक औषधी वापर हुमणी किड नियंत्रण मोहीम, बेड वरती लागवड करणे, जैविक औषध निर्मिती यामध्ये निंबोळी अर्क दशपर्णी अर्क जीवामृत, बिजामृत याविषयी शेतकरी बांधवांना अवगत केले.





तसेच रासायनिक खते खरेदी करताना ''फ्रेमवर्क फॉर फर्टीलायझर सेल'' हे ॲप प्लेस्टोअर मधून डाऊनलोड करून ऑनलाइन खतांची बुकिंग करण्याविषयी मार्गदर्शन केले.

कृषी सेवक बळीराम ठेंगडे यांनी बियाणे उगवण क्षमता चाचणी प्रयोग, बीज प्रक्रिया व हुमणी आळी नियंत्रण प्रात्यक्षिक शेतकरी आयुब शेख यांच्या शेतावर करून दाखविले. मकार्यक्रमासाठी गावातील आयुब शेख, भास्कर गायकवाड, रामदास देशमुख, रामेश्वर गायकवाड, योगेश गायकवाड, राजू भाडाईत, अशोक नवले, थोरात पाहुणे, वसंत खारतोडे, प्रभाकर गायकवाड, ज्ञानेश्वर गायकवाड, बाळू गायकवाड, सोमनाथ गायकवाड, भाऊसाहेब गुंड, अतुल चापे, आप्पासाहेब नवले, बाबासाहेब चव्हाण, बाबासाहेब डोंगरे, कमु बेग, सिकंदर मिर्झा, शेरु शेख, कादर शेख, रावसाहेब जाधव सह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पतसंस्थेचा चेक बाऊन्स ; महिला आरोपीला एक वर्ष कारावास

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर** : वैजापूर येथील रेणुकामाता महिला नागरी सहकारी पतसंस्थेकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड न करता दिलेला धनादेश (चेक) खाते बंद असल्याने वटला नसल्याप्रकरणी न्यायालयाने महिला आरोपीला दोषी ठरवत एक वर्षाच्या साध्या कारावासाची शिक्षा सुनावली आहे. तसेच चेकच्या रकमेवर व्याजासह भरपाई देण्याचे आदेशही न्यायालयाने दिले आहेत. या प्रकरणातील आरोपी ज्योती अशोक डांगे (रा. शिवराई, ता. वैजापूर) यांनी पतसंस्थेकडून १ लाख ६० हजार रुपयांचे कर्ज घेतले होते. कर्जवसुलीसाठी त्यांनी पतसंस्थेला १ लाख ९७ हजार १२५ रुपयांचा धनादेश दिला होता. मात्र संबंधित बँक खाते बंद असल्यामुळे हा धनादेश ६ डिसेंबर २०२२ रोजी वटला नसल्याचे समोर आले.

या प्रकरणाची सुनावणी वैजापूर येथील अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी श्रीमती व्ही. व्ही. सुपेकर यांच्या न्यायालयात झाली. न्यायालयाने आरोपीला दोषी ठरवत एक वर्षाच्या साध्या कारावासाची शिक्षा सुनावली. तसेच चेकची मूळ रक्कम १ लाख ९७ हजार १२५ रुपये व त्यावरील ९ टक्के वार्षिक व्याज एका महिन्याच्या आत पतसंस्थेला अदा करण्याचे आदेश दिले आहेत. निर्धारित मुदतीत रक्कम न भरल्यास आरोपीला आणखी दोन महिन्यांचा कारावास भोगावा लागणार आहे.

या खटल्यात रेणुकामाता महिला नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने ॲड. शिवप्रसाद एम. औटी यांनी काम पाहिले.

### मुळा कारखाना बिनविरोधच्या मार्गावर तर ज्ञानेश्वरमध्ये लढती होणार

**सुधीर चव्हाण । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : मुळा सहकारी साखर कारखाना व लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या संचालक मंडळ निवडणुकांमध्ये उमेदवारी अर्जांच्या छाननीनंतर निवडणुकीचे चित्र थोडे स्पष्ट होऊ लागले आहे. दोन्ही कारखान्यांतील उमेदवारांचे भवितव्य आता १८ जूनपर्यंतच्या माघारी प्रक्रियेवर अवलंबून आहे.

मुळा कारखान्याच्या २१ जागांसाठी दाखल ९४ अर्जांपैकी १८ अर्ज अवैध ठरल्याने ७६ उमेदवार शिल्लक राहिले आहेत. गटनिहाय नेवासा ११, घोडेगाव ८, खरवंडी ७, प्रवरा संगम ६, करजगाव १५, सोनई ७, सोसायटी २ अनुसूचित जाती-जमाती ३, महिला ७, इतर मागासवर्गीय ३ आणि विमुक्त जाती-भटक्या जमाती ७ उमेदवार वैध ठरले आहेत. सोसायटी मतदारसंघातून माजी मंत्री व विद्यमान चेअरमन शंकरराव गडाख यांचाच अर्ज शिल्लक राहिल्याने त्यांची बिनविरोध निवड निश्चित झाली आहे. करजगाव गट आणि महिला राखीव मध्ये विरोधी चार उमेदवार अद्याप रिंगणात आहेत

ज्ञानेश्वर कारखान्याच्या २१ जागांसाठी दाखल २४० अर्जांपैकी १०६ अर्ज छाननीत बाद झाले असून १३४ उमेदवार रिंगणात आहेत. गटनिहाय शेवगाव ९, शहरटाकळी ७, कुकाणा २३, नेवासा १३, वडाळा १५, ढोरजळगाव ११, उत्पादक, बिगर उत्पादक व पणन संस्था प्रतिनिधी ५, अनुसूचित जाती-जमाती ३, महिला ११, इतर मागासवर्गीय २८ आणि विमुक्त जाती-भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग ९ उमेदवार शिल्लक आहेत. येथे अनेक गटात विरोधी उमेदवार अद्याप रिंगणात आहेत त्यामुळे निवडणूक होणार का याकडे लक्ष आहे

दोन्ही कारखान्यांमध्ये उमेदवारी अर्ज माघारी घेण्याची मुदत १८ जूनपर्यंत असून त्यानंतर अंतिम उमेदवारांची यादी जाहीर होणार आहे. त्यामुळे निवडणुकीचे खरे चित्र माघारीनंतरच स्पष्ट होणार आहे.

## वीज समस्येवर विशाल संचेती आक्रमक; महावितरणाला दिला इशारा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर,**: शहरात वारंवार आणि वेळी-अवेळी खंडित होणाऱ्या वीज पुरवठ्यामुळे नागरिक, व्यापारी तसेच बँकिंग क्षेत्रातील ग्राहक त्रस्त झाले आहेत. या पार्श्वभूमीवर मर्चंट बँकेचे माजी चेअरमन तथा नगरसेवक विशाल संचेती यांनी आज सकाळी व्यापाऱ्यांसह महावितरण कार्यालय गाठून अधिकाऱ्यांना जाब विचारला. यावेळी संचेती यांनी शहरातील वीज पुरवठा खंडित करण्यापूर्वी नागरिकांना पूर्वसूचना देण्याची मागणी केली. महावितरण ग्राहकांकडून थकीत वीजबिलांची वसुली वेळेवर करते, मात्र वारंवार खंडित होणाऱ्या वीज पुरवठ्यामुळे नागरिकांचे मोठे नुकसान होत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.भविष्यात वीज पुरवठा खंडित झाल्यास नागरिकांचा संयम सुटू शकतो, असा इशाराही त्यांनी दिला. तसेच कोणताही तांत्रिक बिघाड झाल्यास कुशल तंत्रज्ञांच्या मदतीने अल्पावधीत वीज पुरवठा सुरळीत करण्याची मागणी केली. दरम्यान, नगरसेवक विशाल संचेती यांनी महावितरणाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी दूरध्वनीवरून चर्चा करून वैजापूरकरांच्या वतीने तीव्र नाराजी व्यक्त केली. बँकिंग क्षेत्र, व्यापारी वर्ग आणि सर्वसामान्य नागरिकांना भविष्यात कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये, यासाठी सकारात्मक आणि सविस्तर चर्चा करण्यात आली.यावर महावितरणच्या स्थानिक अधिकाऱ्यांनी अपुरी कर्मचारी संख्या आणि नव्याने नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांमुळे काही अडचणी निर्माण होत असल्याचे सांगितले. तसेच येत्या १५ जूनपर्यंत वीज पुरवठ्याच्या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्याचे आश्वासन त्यांनी दिले.वैजापूर शहरातील वीज समस्येबाबत नागरिकांमध्ये वाढत असलेली नाराजी लक्षात घेता, महावितरण प्रशासनाने दिलेल्या आश्वासनांची अंमलबजावणी होते का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.



## निधन वार्ता

### पांडुरंग हरिदास



**कोपरगाव** :: पंढरपूर येथे राहणारे पांडुरंग प्रभाकर हरिदास (वय ८०) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. पंढरपूर अर्बन बँकेतील कपिल हरिदास यांचे ते वडील होते. मुकुंद व श्रीकांत हरिदास यांचे बंधू, तर वृत्तपत्र विक्रेते व हरिदास बुक स्टॉलचे संचालक ज्ञानेश व रुपेश यांचे ते काका होते. रेणुकामाता व विठ्ठल भक्त म्हणून त्यांची ख्याती होती.

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

### नशिबाची परिक्षा

शुक्रवार दि . ५ जून २०२६

**मिलनम डे**

| उदय-अस्त | | सिंगल ५-१-९ मजबुत | |
|---|---|---|---|
| १६० २५० ७०० | ७-४ | १३० १४९ ४०० | जोड ७६-१४-३२-८०-४५ |

**कल्याण**

| उदय-अस्त | | सिंगल ९-४-५ मजबुत | |
|---|---|---|---|
| १२० ६७० ५८० | ३-६ | १२३ २६८ ६०० | जोड ३२-०८-१४-७५-६९ |

**मुंबैम (मेन)**

| उदय-अस्त | | सिंगल ४-७-९ मजबुत | |
|---|---|---|---|
| १४० २३० ३८० | ५-८ | १२५ २६० ४४० | जोड ५१-२८-३४-७९-८० |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

### शुभ लाभ

| | |
|---|---|
| 09/03/2026 | 2 2 1 8 5 8 2 1 3 1 |
| To | 3 16 4 6 56 8 7 05 8 4 43 4 3 09 3 |
| 13/03/2026 | 6 0 8 0 8 9 8 8 4 5 |
| 16/03/2026 | 4 8 2 3 4 4 1 1 6 3 |
| to | 5 56 9 0 21 8 6 02 9 2 02 3 7 38 7 |
| 20/03/2026 | 6 9 0 0 0 9 7 8 0 8 |
| 23/03/2026 | 6 3 4 1 5 7 1 2 3 1 |
| to | 8 34 5 5 46 7 6 03 8 3 46 4 3 64 6 |
| 27/03/2026 | 9 6 5 8 9 8 0 0 0 7 |
| 30/03/2026 | 2 1 1 1 2 1 1 1 1 2 |
| to | 8 90 3 3 87 6 7 97 1 1 12 5 6 66 5 |
| 03/04/2026 | 9 6 4 0 0 9 9 6 9 9 |
| 06/04/2026 | 1 2 1 7 1 4 3 1 1 4 |
| to | 3 70 2 4 02 7 3 98 7 5 82 5 2 78 6 |
| 10/04/2026 | 3 6 5 8 5 7 0 6 4 8 |
| 13/04/2026 | 5 1 1 6 2 5 1 8 2 1 |
| to | 6 06 5 4 43 7 3 45 0 3 77 9 6 85 4 |
| 17/04/2026 | 9 0 9 0 9 0 3 0 0 0 |
| 20/04/2026 | 5 1 8 4 1 3 5 3 3 3 |
| to | 7 00 2 8 58 5 2 53 5 5 71 8 4 68 7 |
| 24/04/2026 | 8 7 9 9 2 5 7 0 9 8 |
| 27/04/2026 | 3 1 4 7 1 1 6 1 6 2 |
| to | 5 63 2 4 85 8 6 71 2 7 29 9 8 27 5 |
| 01/05/2026 | 8 0 0 0 0 8 9 9 8 0 |
| 04/05/2026 | 1 3 1 6 2 2 2 2 2 2 |
| to | 7 71 9 4 34 8 3 48 7 4 25 5 4 66 5 |
| 08/05/2026 | 9 9 8 0 9 9 6 8 0 9 |
| 11/05/2026 | 5 2 3 2 6 2 1 1 4 1 |
| to | 6 79 7 7 04 3 0 68 3 9 01 2 7 85 5 |
| 15/05/2026 | 6 0 0 9 0 3 0 8 7 9 |
| 18/05/2026 | 8 4 5 1 1 1 7 4 2 2 |
| to | 9 79 5 6 96 7 4 22 2 8 30 8 8 93 5 |
| 22/05/2026 | 0 0 8 8 7 9 8 8 9 6 |
| 25/05/2026 | 5 2 3 1 8 4 1 2 4 5 |
| to | 6 11 9 4 37 3 9 78 6 9 05 5 6 06 5 |
| 29/05/2026 | 0 0 6 3 0 8 0 8 0 6 |
| 01/06/2026 | 4 1 9 1 2 5 1 |
| to | 4 89 3 9 80 2 6 82 7 21 |
| 05/06/2026 | 0 5 0 7 0 0 8 |

# आरएसपीएल समूहाचा ५० वर्षांचा यशस्वी प्रवास

## 'मेड इन इंडिया' संकल्पनेला दिली बळकटी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नाशिक**, भारतातील आघाडीच्या एफएमसीजी समूहांपैकी एक असलेल्या आरएसपीएल समूहाने आपल्या स्थापनेची ५० वर्षे पूर्ण केली असून, कानपूरमधील एका छोट्या उद्योगातून जागतिक स्तरावरील उद्योगसमूहापर्यंतचा प्रवास यानिमित्ताने साजरा केला. 'भारतामध्ये निर्मित, भारतासाठी' या त्त्वज्ञानावर आधारित वाटचालीमुळे कंपनीने देशांतर्गत उत्पादन क्षेत्राला मोठे योगदान दिले आहे.

या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त आरएसपीएल समूहाने आपल्या प्रवासावर आधारित विशेष लघुपट सादर केला आहे. अभिनेते व दिग्दर्शक रजत कपूर यांच्या निवेदनातून साकारलेल्या या चित्रपटात कंपनीची मूल्ये, वाटचाल आणि भविष्यातील दृष्टीकोन अधोरेखित करण्यात आला आहे.

घडी डिटर्जंट या प्रमुख ब्रँडपासून सुरू झालेल्या आरएसपीएल समूहाने आज साबण, डिटर्जंट, वैयक्तिक निगा, दुग्धजन्य पदार्थ, रासायनिक उत्पादने, फॅशन, अन्न व पेय, स्थावर मालमत्ता, पायाभूत सुविधा आणि अक्षय ऊर्जा क्षेत्रात विस्तार केला आहे. देशभरातील २४ हून अधिक उत्पादन प्रकल्पांद्वारे कंपनी उत्पादन करत असून तिची उत्पादने नेपाळ, बांगलादेश आणि इथिओपियासह अनेक देशांमध्ये पोहोचत आहेत.

समूहाने शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, महिला सक्षमीकरण, क्रीडा आणि समुदाय विकास क्षेत्रातही उल्लेखनीय योगदान दिले आहे. आगामी काळात संशोधन, नावीन्यपूर्ण उत्पादन विकास आणि शाश्वत उत्पादन पद्धतींवर भर देत ग्राहककेंद्री विकास साधण्यास कंपनी कटिबद्ध असल्याचे संयुक्त व्यवस्थापकीय संचालक राहुल ज्ञानचंदानी यांनी सांगितले.

द•ख•ल

## मूल्य साखळी भागीदार’ निवडीसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**पुणे :** राज्यात तेलबिया पिकांचे उत्पादन वाढवून खाद्यतेल आयात कमी करण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाच्या राष्ट्रीय खाद्यतेल अभियान-तेलबिया (छचएज-जड) अंतर्गत शेतकरी उत्पादक कंपन्या (ऋझऊ) व सहकारी संस्थांची ‘मूल्य साखळी भागीदार’ (तउझ) म्हणून निवड करण्यात येणार आहे. सोयाबीन, भुईमूग आणि सूर्यफूल पिकांमध्ये कार्यरत असलेल्या पात्र शेतकरी उत्पादक कंपन्या व सहकारी संस्थांकडून अर्ज मागविण्यात आले असून, अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत १५ जून २०२६ आहे. या योजनेद्वारे तेलबिया उत्पादन वाढीसाठी तांत्रिक सहाय्य, शेतकरी प्रशिक्षण, प्रमाणित बियाणे वितरण, कृषी मॅपरवर शेतकरी नोंदणी तसेच बाजारपेठ जोडणीसारख्या उपक्रमांची अंमलबजावणी केली जाणार आहे. पात्र संस्थांनी कंपनी किंवा सहकारी कायद्यांतर्गत नोंदणीकृत असणे, किमान तीन वर्षांचा अनुभव, २०० पेक्षा अधिक शेतकरी सभासद आणि मागील तीन वर्षांची सरासरी वार्षिक उलाढाल ९ लाख रुपयांपेक्षा जास्त असणे आवश्यक आहे. जिल्ह्यातील पात्र संस्था व कंपन्यांनी आपले प्रस्ताव संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयात वेळेत सादर करावेत, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संजय काचोळे यांनी केले आहे.

## गोदाम बांधकाम, तेलबिया प्रक्रिया युनिट व मिनी ऑईल मिलसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**पुणे :** राष्ट्रीय खाद्यतेल अभियान-गळीतधान्य योजनेंतर्गत पुणे जिल्ह्यात गोदाम बांधकाम, तेलबिया प्रक्रिया युनिट तसेच मिनी ऑईल मिल, एक्सपेलर उभारणीसाठी इच्छुक लाभार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत. योजनेअंतर्गत २५० मे.टन क्षमतेच्या गोदाम बांधकामासाठी प्रत्यक्ष खर्चाच्या ५० टक्के किंवा कमाल १४.५० लाख रुपये अनुदान देण्यात येणार आहे. तसेच १० टन क्षमतेच्या तेलबिया प्रक्रिया युनिटसाठी प्रकल्प खर्चाच्या ३३ टक्के किंवा कमाल ९.९० लाख रुपये अनुदान अनुज्ञेय आहे. मिनी ऑईल मिल, एक्सपेलर फिल्टर प्रेस सह रु. ४ लाख, युनिट व मिनी ऑईल मिल, एक्सपेलर फिल्टर प्रेस शिवा रु. ३ लाख, युनिटसाठी पात्र प्रवर्गानुसार युनिट किंमतीच्या ४० ते ५० टक्क्यांपर्यंत अनुदान उपलब्ध आहे. इच्छुक शेतकरी, शेतकरी उत्पादक संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या व सहकारी संस्थांनी आवश्यक कागदपत्रांसह दि. ३० जुलै २०२५ पर्यंत संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयात अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संजय काचोळे यांनी केले आहे.

## निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण मंडळाच्या राज्य प्रसिद्धी प्रमुखपदी नवनाथ फलके

**डिंभे :** निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण मंडळाच्या महाराष्ट्र राज्य कार्यकारिणीची नुकतीच घोषणा करण्यात आली असून, आंबेगाव तालुक्यातील वन्यजीव अभ्यासक नवनाथ फलके यांची महाराष्ट्र राज्य प्रसिद्धी प्रमुखपदी निवड करण्यात आली आहे. पर्यावरण संवर्धन, प्रदूषण नियंत्रण, वृक्षसंवर्धन, जलसंधारण आणि जनजागृतीसाठी कार्यरत असलेल्या या संस्थेची स्थापना दिवंगत आबासाहेब मोरे यांच्या संकल्पनेतून झाली आहे. ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या मार्गदर्शनाखाली संस्था राज्यभर विविध पर्यावरणपूरक उपक्रम राबवत आहे. नवनाथ फलके हे जुन्नर वनपरिक्षेत्रात वन्यजीव अभ्यासक म्हणून कार्यरत असून वृक्षसंवर्धन, जैवविविधता संरक्षण, पक्षी व वन्यजीव संवर्धन तसेच बिबट-मानव संघर्ष जनजागृतीसाठी अनेक वर्षांपासून कार्यरत आहेत. उपवनसंरक्षक, जुन्नर वनपरिक्षेत्र प्रशांत खाडे, सहाय्यक वनसंरक्षक अमृत शिंदे आणि वनपरिक्षेत्र अधिकारी, घोडेगाव वनपरिक्षेत्र कुणाल लिमकर यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे. नियुक्तीबद्दल प्रतिक्रिया व्यक्त करताना फलके यांनी संस्थेची उद्दिष्टे आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश अधिक प्रभावीपणे समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी कार्यरत राहणार असल्याचे सांगितले. त्यांच्या निवडीबद्दल संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी शुभेच्छा व्यक्त केल्या.

## काढणीपश्चात प्रक्रिया युनिट स्थापनेसाठी २० जूनपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**पुणे :** कडधान्य पिकांच्या मूल्यवर्धनास चालना देऊन शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याच्या उद्देशाने काढणीपश्चात पायाभूत सुविधा घटकांतर्गत प्रक्रिया व पॅकेजिंग युनिट स्थापनेसाठी २० जूनपर्यंत अर्ज मागविण्यात आले आहेत. या योजनेअंतर्गत प्रक्रिया युनिटसाठी आवश्यक यंत्रसामग्री, उपकरणे तसेच इमारत, गोदाम व साठवण सुविधा उभारणीसाठी प्रकल्प खर्चाच्या ३३ टक्के किंवा कमाल २५ लाख रुपये, यापैकी जे कमी असेल तेवढे अनुदान देण्यात येणार आहे. शेतकरी उत्पादक संस्था, क्लस्टर स्तर महासंघ, प्राथमिक कृषी पतसंस्था, वैयक्तिक शेतकरी तसेच नोंदणीकृत इतर उपक्रम अर्जास पात्र आहेत. गट लाभार्थी संस्था किमान दोन वर्षे नोंदणीकृत व कार्यरत असणे आवश्यक असून, प्रकल्प खर्चातील किमान १५ टक्के रक्कम लाभार्थ्यांनी उभारणे आवश्यक आहे. वैयक्तिक लाभार्थ्यांचे वय किमान २१ वर्षे असावे व एका कुटुंबातील केवळ एका व्यक्तीस अर्थसहाय्य दिले जाईल. अनुसूचित जाती-जमाती, महिला व डोंगराळ क्षेत्रातील लाभार्थ्यांना प्राधान्य देण्यात येणार आहे. इच्छुकांनी आवश्यक कागदपत्रांसह २० जून २०२५ पर्यंत संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयात अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संजय काचोळे यांनी केले आहे.

## लोकसभा सचिवालयातील ग्रंथालय अधिकाऱ्यांची यशदामध्ये क्षमता बांधणी

**पुणे :** नवी दिल्लीतील लोकसभा सचिवालयात संशोधन आणि ग्रंथालय विभागात कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांसाठी यशदामध्ये क्षमता बांधणी प्रशिक्षण कार्यक्रम यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनीच्या (यशदा) वतीने आयोजित करण्यात आला आहे. लोकसभा संशोधन व प्रशिक्षण संस्था (प्राईड) यांनी यांच्यावतीने आयोजित प्रशिक्षण कार्यक्रम यशदाच्या ग्रंथालय येथे आयोजन करण्यात आले आहे. पाच दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमात कृत्रिम बुद्धिमत्तेच्या संशोधन व ग्रंथालयाच्या कामकाजात अधिकाधिक प्रभावी वापर करण्याच्यादृष्टीने मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामध्ये ग्रंथालयांवर कृत्रिम बुद्धिमत्तेचा परिणाम, आधुनिक तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डिजिटल ज्ञान व्यवस्थापन या विषयांवर विविध तज्ज्ञांचे मार्गदर्शन होणार आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमात २३ प्रशिक्षणार्थी अधिकारी सहभागी झाले आहेत. या कार्यक्रमाचे उद्घाटन यशदाचे अतिरिक्त महासंचालक शेखर गायकवाड यांच्या हस्ते झाले. यावेळी उपमहासंचालक पौर्णिमा गायकवाड , ‘प्राईड’चे संचालक पी. के. मल्लिक उपस्थित होते. या प्रशिक्षण कार्यक्रमात तज्ज्ञ मार्गदर्शक चेतन टाकसाळे, डॉ. राजेंद्र कुंभार, विश्वास हसे, प्रल्हाद जाधव आदींनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमांतर्गत गोवा येथील सेंट्रल लायब्ररी व गोवा विधानसभेला अभ्यासभेट आयोजित करण्यात आली आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमाचे सत्रसंचालक म्हणून यशदाचे ग्रंथपाल शशिकांत चौधरी यांनी तर सहयोगी सत्र संचालक म्हणून विनय कुलकर्णी यांनी काम पाहिले.

# भेसळयुक्त अन्नपदार्थांचा ३१ लाख ७३ हजार रुपयांचा साठा जप्त

## प्रतिबंधित अन्न पदार्थांवर १४ ठिकाणी धाडी; दोषींवर गुन्हे दाखल

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** पुणे विभागात अन्न व औषध प्रशासन विभागाने १ व २ जून २०२६ रोजी भेसळीच्या संशयावरून ठिकठिकाणी छापे टाकून केलेल्या कारवाईत ३१ लाख ७३ हजार रुपयांचे अन्न पदार्थांची जप्ती केली आहे. तसेच या कालावधीत तब्बल ५ लाख ४५ हजार रुपयांचा प्रतिबंधित अन्न पदार्थ साठा जप्त करण्मयासह त्यासंबंधी १४ जणांवर गुन्हे दाखल करून अटक करण्यात आली आहे, अशी माहिती पुणे विभागाचे सह आयुक्त (अन्न) दि. वा. भोगावडे यांनी दिली आहे.

अन्न सुरक्षा आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांच्या ‘सुरक्षित अन्न, सुरक्षित औषधे, सुरक्षित महाराष्ट्र’ या मोहिमेनुसार अन्न व औषध प्रशासन पुणे विभागात पुणे, सातारा, सांगली, सोलापूर व कोल्हापूर जिल्ह्यात विविध आस्थापनाची तपासणी व धडक कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईत संबंधित जिल्ह्यातील सहायक आयुक्त (अन्न) यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न सुरक्षा अधिकारी व कर्मचाऱ्यांनी भाग घेतला.

सातारा जिल्ह्यात १ जून रोजी गोडोली, सातारा येथील मेसर्स धन्वंतरी डिस्ट्रीब्यूटर्स प्रा.लि. येथे केलेल्या कारवाईत प्रोटिरिच- डब्ल्यू हर्बल हेल्थ ड्रिंक, चॉकलेट कंपाऊंड, सी बकथॉर्न ज्यूस याचा एकूण २१ लाख ४० हजार ९४६ रुपयांचा अन्न पदार्थ साठा जप्त



करण्यात आला आहे.

पुणे जिल्ह्यात २ जून रोजी ४२३, मार्केट यार्ड येथील मेसर्स प्राज ट्रेडर्स येथे कारवाई करून रिफाईन्ड सोयाबीन ऑईल, आर.बी.डी. पामोलीन ऑईल याचा एकूण ५ लाख ३४ हजार २५२ रूपयांचा साठा जप्त करण्यात आला आहे. केशवनगर, काळेवाडी रोड, चिंचवड येथील मे. महाराष्ट्र मिल्क डेअरी येथे धडक कारवाईअंतर्गत २७ हजार ६०० रूपयांचे ‘चीज ॲनालॉग’ जप्त करण्यात आले आहे.

वडगाव शेरी येथील स.नं. ५०/४, मते नगर येथील मे. विठूमाऊली डेअरी येथे भेसळयुक्त गाईचे तूप आणि पनीर असा सुमारे १५ हजार रुपये किंमतीचा साठा जप्त करण्यात आला. स.नं. ३७/१, सुप्रिया बिल्डिंग, खराडी येथील मे. शिवदत्त डेअरी येथे १ लाख ७३ हजाराहून अधिक रकमेचे पनीर जप्त करण्यात आले.

कोल्हापूर जिल्ह्यात २ जून रोजी बाजारगेट, कोल्हापूर येथील मे. बनछोडे ब्रदर्स ऑईल मिल येथे ९२ हजार रुपयांचा रिफाईन्ड कॉटनसीड ऑईल व फिल्टर्ड ग्राऊंडनट ऑईलचा साठा जप्त करण्यात आला. हातकणंगले तालुक्यात इचलकरंजी येथील बालाजी चौकातील मे. रामगोपाल भवरलाल सोनी येथे ९७ हजार ६०० रुपये किमतीचा रिफाईन्ड सोयाबीन ऑईल साठा भेसळीच्या संशयावरून जप्त करण्यात आला. धरणगुट्टी ता. शिरोळ येथे मे. हिदांश इंडस्ट्रीज येथे टाकलेल्या छाप्यात ८ हजार ८८० रुपयांचा ॲनालॉग सुपारी साठा भेसळीच्या संशयावरून व लेबलदोष, मिथ्याछाप असल्याचे आढळून आल्याने जप्त करण्यात आला.

**५ लाख ४५ हजार रुपयांचा प्रतिबंधित अन्न पदार्थ साठा जप्त**

पुणे विभागात ठिकठिकाणी १४ आस्थापनांची तपासणी करून ५ लाख ४५ हजार रुपयांचा प्रतिबंधित अन्न पदार्थ साठा जप्त करून संबंधितांवर भारतीय न्याय संहितेनुसार गुन्हा दाखल करण्यासह अटकेची कारवाई करण्यात आली आहे.

१ जून रोजी बाणेर येथील शंभो पान शॉप व जय मल्हार पान शॉप या ठिकाणी तपासणी केली असता तेथून ७ हजार ५०० हून अधिक रुपयांचा प्रतिबंधित अन्न पदार्थ साठा जप्त करण्यात आला आहे. हिंजवडी फेज-१ येथे विनोद पान शॉप, रायरेश्वर पान शॉप, आयटी स्मोक झोन पान शॉप, सिद्धेश्वर पान शॉप व लक्ष्मी पान शॉप अशा एकूण ५ आस्थापनानंमधून एकूण २५ हजार रुपयांचा प्रतिबंधित अन्न पदार्थ साठा जप्त करण्यात आला आहे. इंदापूर तालुक्यात १ जून रोजी केलेल्या कारवाईत १ लाख ०७ हजार रुपयांचा प्रतिबंधित अन्न पदार्थ साठा व वाहतूक करणारी १ लाख ५० हजार रूपये किमतीची गाडी जप्त करण्यात आली आहे.

सातारा जिल्ह्यात १ जून रोजी साताऱ्यातील बुवा पान शॉप, सदर बाजार, सातारा येथे धडक कारवाईदरम्यान ३० हजार ६०० रूपये किंमतीचा प्रतिबंधित अन्न पदार्थ साठा जप्त करण्यात आला. सोलापूर जिल्ह्यात १ जून रोजी बाबा पान शॉप, गांधी चौक, अकलूज या ठिकाणी १ लाख १६ हजार रुपयाचा प्रतिबंधित अन्न पदार्थ साठा तसेच ७५ रूपयांचे गुटखा बनवणारे यंत्र जप्त करण्यात आले. २ जून रोजी अगलगाव रोड, तालुका बार्शी येथील त्रिमूर्ती पान शॉप येथे १३ हजाराहून अधिक किमतीचा प्रतिबंधित अन्न पदार्थ साठा जप्त करण्यात आला.

सांगली जिल्ह्यात २ जून रोजी सांगली येथील मे. ए के पान शॉप तसेच गांधी चौक, विटा येथील मे. बालाजी पान शॉप येथे धडक कारवाईदरम्यान सुमारे २८ हजार रुपये किंमतीचा प्रतिबंधित अन्न पदार्थ साठा जप्त करण्यात आला.

अन्न व औषध प्रशासनामार्फत ग्राहकांच्या आरोग्याशी तडजोड करणाऱ्या तसेच बेकायदेशी प्रतिबंधित अन्न उत्पादन, साठवणूक, वितरण व विक्री करणाऱ्या आस्थापनाविरुद्ध अशा मोहिमा भविष्यातही सुरू राहणार असून नागरिकानी अशा बाबीची माहिती प्रशासनाच्या टोल फ्री क्रमांक १८००२२२३६५ वर द्यावी, असे आवाहन श्री. भोगावडे यांनी केले आहे.

## पीएमसी ३६० प्रकल्पाला राष्ट्रीय ई-गव्हर्नन्स सिल्व्हर अवॉर्ड

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** पुणे महानगरपालिकेने डिजिटल प्रशासन आणि नागरिकाभिमुख सेवा क्षेत्रात राष्ट्रीय स्तरावरील महत्त्वपूर्ण यश संपादन केले आहे. भारत सरकारच्या प्रशासकीय सुधारणा व सार्वजनिक तक्रार निवारण विभागाकडून (अठझञ्ञ) प्रदान करण्यात येणाऱ्या राष्ट्रीय ई-गव्हर्नन्स पुरस्कार २०२६ मध्ये पुणे महानगरपालिकेच्या ‘पीएमसी ३६०’ या डिजिटल परिवर्तन प्रकल्पाची ‘ई-गव्हर्नन्स अंतर्गत जिल्हा/शहरी स्थानिक स्वराज्य संस्था स्तरावरील उपक्रम’ या श्रेणीत सिल्व्हर अवॉर्डसाठी निवड करण्यात आली आहे.

महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच अतिरिक्त महापालिका आयुक्त (जनरल) पवनीत कौर, अतिरिक्त महापालिका आयुक्त (इस्टेट) प्रजीत नायर, अतिरिक्त महापालिका आयुक्त (विशेष) ओमप्रकाश दिवटे आणि माहिती व तंत्रज्ञान विभागाचे सिस्टीम ॲडमिनिस्ट्रेटर राहुल जगताप यांच्या सहकार्याने महानगरपालिकेने गेल्या काही वर्षांत डिजिटल परिवर्तनाची व्यापक मोहीम राबविली. या मोहिमेत महापालिकेच्या संकेतस्थळाचे संपूर्ण आधुनिकीकरण, विविध डिजिटल प्रणालींचे पुनरुज्जीवन, नवीन नागरिकाभिमुख सेवा प्रणालींची निर्मिती तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित सेवांचा विकास करण्यात आला.

या सर्व उपक्रमांचे सादरीकरण नवी दिल्ली येथे तज्ज्ञ समितीसमोर करण्यात आले होते. त्यानंतर झालेल्या राष्ट्रीय स्तरावरील मूल्यमापन प्रक्रियेत ‘पीएमसी ३६०’ प्रकल्पाची सिल्व्हर अवॉर्डसाठी निवड करण्यात आली. विविध विभागांच्या समन्वयातून हा प्रकल्प यशस्वीपणे राबविण्यात आला आहे.

‘पीएमसी ३६०’ अंतर्गत आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित नवीन संकेतस्थळ विकसित करण्यात आले असून ऑनलाइन सेवा पोर्टल, तक्रारींचे विश्लेषण व व्यवस्थापन, व्हॉट्सॲपद्वारे सेवा व माहिती उपलब्ध करून देणे, तसेच तक्रार निवारण यंत्रणा अधिक प्रभावी करण्यात आली आहे. याशिवाय महापालिकेने विविध प्रकल्पांमध्ये एआय आधारित तंत्रज्ञानाचा वापर सुरू केला आहे.

समृद्ध ऐतिहासिक वारसा जपत पुणे शहर आज डिजिटल प्रशासन क्षेत्रातील देशातील अग्रगण्य शहरांपैकी एक म्हणून उदयास येत आहे. ‘पीएमसी ३६०’ उपक्रमामुळे नागरिकांना जलद, पारदर्शक, सुलभ आणि विश्वासार्ह सेवा उपलब्ध होत असून स्मार्ट गव्हर्नन्सच्या दिशेने पुणे महानगरपालिका नवा आदर्श निर्माण करत आहे. राष्ट्रीय ई-गव्हर्नन्स पुरस्कार २०२६ मधील हा सन्मान महापालिकेचे अधिकारी, कर्मचारी, तंत्रज्ञान भागीदार आणि पुणेकर नागरिकांच्या सामूहिक प्रयत्नांची पोचपावती मानला जात आहे.

## आषाढी वारीच्या तयारीचा विभागीय आयुक्तांकडून आढावा; संत ज्ञानेश्वर मंदिरात नियोजन बैठक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आळंदी :** आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर भाविकांना अधिकाधिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आणि वारीचे नियोजन सुरळीतपणे पार पाडण्यासाठी विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले यांनी गुरुवारी संत ज्ञानेश्वर महाराज मंदिराला भेट देऊन संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांसोबत आढावा बैठक घेतली.

या बैठकीत वारी व्यवस्थापन, भाविकांसाठी आवश्यक सुविधा, वाहतूक व्यवस्था, स्वच्छता, सुरक्षा यंत्रणा तसेच विविध विभागांमधील समन्वय याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. आषाढी वारी सुरक्षित, शिस्तबद्ध आणि निर्विघ्न वातावरणात पार पडावी यासाठी संबंधित विभागांना आवश्यक सूचना देण्यात आल्या.

वारीदरम्यान लाखो भाविक आळंदीत दाखल होत असल्याने त्यांच्या सोयीसुविधांबाबत विशेष दक्षता घेण्याचे निर्देश यावेळी देण्यात आले. तसेच वाहतूक कोंडी टाळण्यासाठी नियोजन, स्वच्छता व्यवस्थेची प्रभावी अंमलबजावणी आणि सुरक्षा यंत्रणेची सज्जता यावर भर देण्यात आला.



यावेळी आळंदी नगरपरिषद व आळंदी ग्रामस्थांच्या वतीने विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले यांचा सत्कार करण्यात आला. प्रसंगी आळंदी देवस्थानचे विश्वस्त मंडळ, नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, मुख्याधिकारी माधव खांडेकर, सभागृह नेते सचिन गिलबिले, माजी नगराध्यक्ष बबनराव कुऱ्हाडे, माजी नगरसेवक डी. डी.भोसले पाटील, नगरसेविका पूजा घुंडरे, नगरसेवक गोविंदा कुऱ्हाडे, कालिदास तापकीर तसेच विविध विभागांचे अधिकारी व मान्यवर उपस्थित होते.

## पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर विभागीय आयुक्तांची सासवड येथे भेट

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**माळशिरस :** संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींचा पालखी सोहळा ११ जुलै रोजी दोन दिवसांच्या वास्तव्यासाठी सासवड येथे येत असुन त्या अनुषंगाने तयारीचा आढावा घेण्यासाठी पुणे विभागाच्या आयुक्त शीतल तेली (उगले) यांनी आज गुरुवार ४जुलै रोजी सासवडच्या पालखी तळावर भेट देऊन तयारीचा आढावा घेतला. उपविभागीय अधिकारी वर्षा लांडगे, तहसीलदार विक्रम राजपुत, बारामती अप्पर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, उप विभागीय पोलीस अधिकारी राजेंद्रसिंह गौर, पोलीस निरीक्षक कुमार कदम,सासवडच्या नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप, जिल्हा परिषद सदस्य हरिभाऊ लोळे, मुख्याधिकारी डॉ कैलास चव्हाण आदी मान्यवर या प्रसंगी उपस्थित होते या प्रसंगी नगराध्यक्षा जगताप व मुख्याधिकारी चव्हाण यांनी पाणी पुरवठा करताना येणारे प्रश्न विशेषतः विद्युत पूरवठा, कचरा संकलन साठी घंटा गाडयांची उपलब्धता शहरातील रस्ते व विकास निधी याविषयी निवेदन देत लक्ष वेधले. संत सोपानकाका पाळखी सोहळ्याचे श्रीकांत गोसावी यांनी सोहळा गावातून जाणाऱ्या मार्गावरील डागडुजी करण्याबाबत तर चांगावटेश्वर



पालखी सोहळ्याचे शशिकांत जगताप यांनी डाळज, शेटफळगडे पालखी मार्गांवरील रस्त्याच्या दुरुस्तीची तसेच दोन्ही पालख्यांना सरकारने विशेष निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली.सर्व सुचना व मागण्या याबाबत सकारात्मक निर्णय घेतले जातील असे शीतल तेली यांनी सांगत लवकरच पुणे येथे होणाऱ्या आढावा बैठकीत सुचना दिल्या जातील असे स्पष्ट केले. महावितरणचे कार्यकारी अभियंता भालचंद्र गवई, सहायक अभियंता रोहित डामसे, कर्मचारी सुनील कामठे, उपनगराध्यक्ष मनोहर जगताप, गटनेते अजित जगताप, पाणी पुरवठा सभापती माऊलीं गिरमे, आरोग्य सभापती राजनभय्या जगताप, नगरसेवक ज्ञानेश्वर जगताप, प्रदीप राऊत, लीना वढणे, स्मिता जगताप, साकेत जगताप, सुहास जगताप, विजय वढणे गुप्तवार्ता चे रुपेश भगत, चोपदार सिद्देश शिंदे, सेवानिवृत्त आरोग्य अधिकारी मोहन चव्हाण, राजू जाधव, नगरपालिकेचे सर्वखातेप्रमुख व काही नागरिक या प्रसंगी उपस्थित होते

## खासगी कृत्रिम रेतन सेवादात्यांनी भारत पशुधन प्रणालीवर नोंदणी करावी : डॉ. किरण पाटील

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** राज्यातील खासगी कृत्रिम रेतन सेवादात्यांनी त्यांच्या कामाची नोंद भारत पशुधन प्रणालीवर करणे आवश्यक असून, यामुळे पशुवैद्यकीय सेवांची अचूक संख्यात्मक माहिती उपलब्ध होऊन सेवांचा दर्जा व गुणवत्ता वृद्धिंगत होण्यास मदत होईल, असे प्रतिपादन पशुसंवर्धन आयुक्त तथा महाराष्ट्र गोजातीय प्रजनन व नियमन प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ. किरण पाटील यांनी केले.

औंध येथील पशुसंवर्धन आयुक्तालयात ‘गोजातीय प्रजनन व नियमन’ या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळेत ते बोलत होते. महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन कायदा व नियमांची प्रभावी अंमलबजावणी, कृत्रिम रेतन सेवांमध्ये पारदर्शकता आणि नॅशनल डिजिटल लाइव्हस्टॉक मिशन अंतर्गत डिजिटल ट्रॅकिंग या विषयांवर कार्यशाळेत सविस्तर चर्चा करण्यात आली.डॉ. पाटील यांनी उच्च उत्पादनक्षम पशुधन वाढीसाठी कृत्रिम रेतन प्रक्रियेत पारदर्शकता आवश्यक असल्याचे सांगत, खासगी सेवादात्यांना पशुसंवर्धन विभागाकडून सर्वतोपरी सहकार्य देण्याचे आश्वासन दिले.कार्यशाळेत बायफ, पुणेचे डॉ. जयंत खडसे यांनी गोजातीय पैदाशीतील अनुभव मांडले, तर चितळे-अइड जेनस प्रा. लि.चे डॉ. परिक्षित देशमुख यांनी ‘जेनोमिक्स आणि सेक्स्ड सीमेन’ या प्रगत तंत्रज्ञानाविषयी माहिती दिली. तसेच सहाय्यक आयुक्त डॉ. राजू कोलते यांनी भारत पशुधन प्रणालीच्या वापराबाबत मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास विविध तज्ज्ञ, सेवा पुरवठादार व संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. खुल्या चर्चेनंतर कार्यक्रमाचा समारोप उपआयुक्त डॉ. प्रशांत भड यांच्या आभार प्रदर्शनाने झाला.

# पावसाळी आपत्कालीन परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी बारामती नगरपरिषद सज्ज

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या सूचनेनुसार आढावा बैठक; प्रशासनाकडून पावसाळी तयारीचा आढावा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बारामती :** आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरात कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवू नये तसेच नागरिकांना आवश्यक सुविधा वेळेत उपलब्ध व्हाव्यात यासाठी बारामती नगरपरिषद प्रशासनाने सर्वंकष तयारी पूर्ण केली आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रावहिनी पवार यांच्या सूचनेनुसार बारामती नगरपरिषद कार्यालयात पावसाळ्यापूर्व तयारीबाबत आढावा बैठक आयोजित करण्यात आली.

या बैठकीत बारामती नगरपरिषदेचे नगराध्यक्ष सचिन सातव यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील नालेसफाई, ड्रेनेज चेंबर स्वच्छता आणि गाळ काढण्याची कामे पूर्ण करण्यात आल्याची माहिती देण्यात आली. पावसाळ्यात शहरातील प्रमुख रस्ते, चौक आणि रहदारीच्या ठिकाणी पाणी साचणार नाही यासाठी विशेष दक्षता घेण्यात येत असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

मुख्याधिकारी पंकज भुसे यांनी संबंधित विभागांना सतर्क राहण्याच्या सूचना देत पावसामुळे नागरिकांना कोणताही त्रास होऊ नये यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करण्याचे निर्देश दिले.



स्वच्छता, वैद्यक व सार्वजनिक आरोग्य समितीचे सभापती नवनाथ बल्लाळ यांनी उर्वरित कामे तातडीने पूर्ण करण्याचे आदेश देत नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देण्याचे आवाहन केले. बैठकीत शहरातील आपत्ती व्यवस्थापन, स्वच्छता, आरोग्य, अग्निशमन आणि उद्यान विभागांच्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला. पावसाळ्यात पूरस्थिती, झाडे पडणे, पाणी साचणे, नाले तुंबणे अथवा इतर कोणतीही आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास तत्काळ मदत उपलब्ध करून देण्यासाठी स्वतंत्र आपत्ती व्यवस्थापन पथक कार्यरत असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

यावेळी नागरिकांनी घाबरून न जाता नगरपरिषदेच्या संबंधित विभागांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले. आपत्ती व्यवस्थापन पथक, आरोग्य व स्वच्छता विभाग तसेच उद्यान विभागातील अधिकाऱ्यांचे व कर्मचाऱ्यांचे संपर्क क्रमांक जाहीर करण्यात आले असून तातडीच्या प्रसंगी नागरिकांना तत्काळ मदत उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

> ‘‘पावसाळ्याच्या काळात नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे. कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास नागरिकांनी घाबरून न जाता नगरपरिषदेच्या आपत्कालीन संपर्क क्रमांकांवर संपर्क साधावा. शहरातील पाणी निचरा, स्वच्छता आणि आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली असून नागरिकांच्या तक्रारींवर तत्काळ कार्यवाही करण्यात येईल.’’
>
> **- नवनाथ बल्लाळ**
>
> **(स्वच्छता, वैद्यक व सार्वजनिक आरोग्य समिती सभापती नवनाथ बल्लाळ )**

सदर बैठकीस मुख्याधिकारी पंकज भुसे, स्वच्छता, वैद्यक व सार्वजनिक आरोग्य समितीचे सभापती नवनाथ बल्लाळ, नगरसेवक निलेश इंगुले, आरोग्य विभाग प्रमुख स्वरूप अहिवळे, आपत्ती व्यवस्थापन पथक प्रमुख तथा अग्निशमन विभाग प्रमुख पद्मनाभ कुल्लरवार, स्वच्छता निरीक्षक अजय लालबिगे, प्रभारी अग्निशमन सहाय्यक अधिकारी निखिल कागडा तसेच आरोग्य विभागाचे सर्व मुकादम उपस्थित होते. बारामती शहरात पावसाळ्यादरम्यान कोणतीही आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास त्याला तोंड देण्यासाठी नगरपरिषद पूर्णपणे सज्ज असून नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी सर्व विभाग सतत कार्यरत राहतील, असा विश्वास प्रशासनाकडून व्यक्त करण्यात आला.

शहरात पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी नगरपरिषदेने विविध विभागांतील अधिकारी व कर्मचाऱ्यांची आपत्कालीन संपर्क यादी जाहीर केली आहे. मुसळधार पाऊस, पाणी साचणे, झाडे पडणे, स्वच्छतेच्या समस्या, आरोग्यविषयक अडचणी अथवा अन्य आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी घाबरून न जाता संबंधित विभागातील अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे...

# कुकडीचे आवर्तन फक्त पिण्यासाठीच

## शेतीसाठी वापर न करण्याचे प्रांताधिकाऱ्यांचे कर्जतकरांना आवाहन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**कर्जत :** कुकडीचे आवर्तन फक्त पिण्यासाठी असून या पाण्याचा वापर जपून करावा. तसेच कर्जत तालुक्यातील एकूण १२ तलावात शासन आदेशानुसार पाणी सोडण्यात आले असून या पाण्याचा कोणीही अवैध उपसा करू नये. अवैध पाणी उपसा करताना कोणी आढळून आल्यास त्याच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात येईल. यासह पाणी उपसा करणारी साधनसामुग्री जप्त करण्याचा इशारा प्रांताधिकारी नितीन पाटील यांनी दिला.

अलनिनोचा प्रभाव तसेच मान्सून पावसाच्या लांबणीची चिन्हे पाहता पाणीटंचाई सदृश्य परिस्थिती निर्माण होणाच्या पार्श्वभूमीवर आणि सर्वसामान्य जनतेच्या मागणीनुसार कुकडी आवर्तनाचे पाणी कर्जत तालुक्यातील आंबीजळगाव, म्हाळगी, देशमुखवाडी, चिलवडी, शेगुड, अळसुंदे यांच्यासह एकूण १२ तलावात सोडण्यात येत आहे. सदरील पाणी फक्त सर्वसामान्य जनतेच्या आणि पशुधनाच्या पिण्यासाठी आरक्षित ठेवण्यात आले आहे. याचा वापर शेतीसाठी करण्यात येऊ नये. तसेच उपलब्ध पाण्याचा वापर अत्यंत काटकसरीने करावा असे आवाहन केले आहे. तलावात सोडलेल्या पाण्याचा अवैध उपसा होणार नाही याची खबरदारी आणि दक्षता घ्यावी. अनधिकृत पाण्याचा उपसा करताना कोणी आढळल्यास सदरची साधनसामुग्री जप्त करण्यात येईलच पण संबंधितावर देखील कायदेशीर दंडात्मक कारवाई होईल असा इशारा कर्जतचे प्रांताधिकारी पाटील यांनी दिला. आजमितीस कर्जत तालुक्यातील मुळेवाडी, डिकसळ, कापरेवाडी, खांडवी, पिंपळवाडी, धालवडी, राक्षसवाडी खुर्द, सोनाळवाडी, कौडाने, चांदे बुद्रुक, राक्षसवाडी बुद्रुक, परिटवाडी आणि चांदे खुर्द या १३ गावांसाठी ११ टँकरद्वारे २४ हजार २०३ नागरिकांना मांदळी, दुरगाव, खेड या ठिकाणाहून २१ खेपाद्वारे पाणी-पुरवठा केला जात आहे. त्यामुळे अलनिनो प्रभावामुळे आणि मान्सून पूर्णपणे सक्रिय होईपर्यंत नागरिकांनी उपलब्ध पाण्याचा वापर अत्यंत काटकसरीने करावा असे आवाहन तालुका प्रशासनाकडून केले आहे.

**जून उजाडला तरी उन्हाचा चटका कायम... नैसर्गिक पाण्याचे जलस्रोत खपाटीला**

मागील वर्षी १४ मे पासूनच अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली होती. मे महिन्यात कर्जत तालुक्यात विक्रमी ३५२ मिमी पावसाची नोंद झाली होती. या पावसाने तालुक्यातील बहुतांश नदी, नाले, ओढे, तलाव आणि बंधारे ओसांडून वाहिले. मात्र यंदा उन्हाच्या तडाख्याने तब्बल ४२ ते ४३ अंशाचा पारा गाठला आणि नैसर्गिक पाण्याच्या जलस्रोताने किमान पातळी गाठली. आता जून उजाडला तरी उन्हाचा चटका कायम राहिला असल्याने मान्सूनच्या सक्रिय होण्याकडे कर्जत तालुक्याची जनता आस लावून बसली आहे.

# कोल्हारला उभारणार लोकनेते गोपीनाथ मुंडेचा अर्धाकृती पुतळा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**शिराळ चिचोंडी :** गोरगरीब, दीनदुबळे आणि १८ पगड जातीच्या सामान्य माणसाच्या कल्याणासाठी आपले आयुष्य वाहून घेणारे बहुजनांचे कैवारी, लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या पुण्यतिथीनिमित्त आदर्श गाव कोल्हार येथे त्यांना भावपूर्ण अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी कोल्हार येथील 'लोकनेते गोपीनाथराव मुंडे सभागृहा'मध्ये मुंडे साहेबांचा भव्य अर्धाकृती पुतळा लवकरच लोकवर्गणीतून उभारण्यात येणार असल्याचा संकल्प सोडण्यात आला.

कार्यक्रमात बोलताना निवृत्त मुख्याध्यापक शिवाजी पालवे यांनी सांगितले की, एक सामान्य कार्यकर्ता ते देशाचे केंद्रीय मंत्री असा थक्क करणारा संघर्षमयी प्रवास मुंडे साहेबांनी केला. महाराष्ट्राच्या राजकारणात आणि समाजकारणात त्यांनी स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण केली. त्यांच्या जाण्याचे दुःख आजही आपल्या सर्वांच्या मनात आहे. मुंडे साहेबांच्या अंगी असलेल्या लोकसेवेच्या गुणांपैकी एखादा जरी गुण आपण अंगीकारला, तरी ती त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल. युवा पिढीला त्यांच्या जीवनसंघर्षातून अविरत प्रेरणा मिळत राहावी, म्हणूनच या सभागृहात लोकवर्गणीच्या माध्यमातून मुंडे साहेबांचा अर्धाकृती पुतळा बसवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या पुण्यतिथी सोहळ्याला व अभिवादन सभेला कोल्हार परिसरातील ग्रामस्थ आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये प्रामुख्याने निवृत्त मुख्याध्यापक शिवाजी पालवे, महादेव पालवे, शिवाजी गर्जे, सदस्य ईश्वर पालवे, भाऊसाहेब पालवे, अशोक गर्जे, बाबाजी जावळे. माजी सरपंच बाबाजी पालवे, उपसरपंच गोरक्ष पालवे,अप्पा गर्जे, अशोक पालवे, नामदेव गिते, भगवान पालवे, अशोक पालवे, बाबासाहेब पालवे, श्याम पालवे, बाळु पालवे, अशोक पालवे, विष्णू पालवे, गोपाळराव गाडेकर प्रशांत पालवे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचा समारोप झाल्यानंतर उपस्थितांचे आभार महादेव पालवे गुरुजी यांनी मानले. मुंडे साहेबांच्या पुतळा उभारणीच्या या निर्णयाचे कोल्हार व परिसरातील नागरिकांमधून अत्यंत उत्साहात स्वागत केले जात आहे.

## द•ख•ल

# शेवगाव तालुक्यात ११३ गावापैकी फक्त २५ गावातच पोलिस पाटील?

**हातगाव :** शेवगाव तालुका हा विस्ताराने व क्षेत्रफळाच्या दृष्टीने मोठा तालुका समजला जात असून या तालुक्यात असणाऱ्या एकूण ११३ गावापैकी फक्त २५ गावातच कामगार पोलिस पाटील अस्तित्वात असून जवळपास ८८ गावे ही पोलिस पाटील वीणा असल्याने या गावातील पोलिस पाटलाची नव्याने नियुक्ती कधी होणार असा प्रश्न अनुत्तरितच असल्याचे दिसून येत आहे. ग्रामीण भागात लोकसंख्येच्या प्रमाणात विचार केला तर आज मितीस तालुक्यात असणारी पोलिस संख्या ही अत्यंत अल्प प्रमाणात असून ही यंत्रणा अनेक वेळा तोकडी पडत असल्याने ग्रामीण भागात प्रत्येक गावात सुरक्षेच्या दृष्टीने महत्वाचा घटक म्हणून सुरुवातीपासून गावागावात काम करणाऱ्या कामगार पोलिस पाटील यांचेकडे पहिले जात होते. त्याचे कारणही असे आहे की, दिवसेदिवस गुन्हेगारीसह इतरही काही ज्या बाबी घडल्या जातात त्याची खबर व माहिती देण्यास आजमितीस कुणीही समोर येत नसल्याने तीच माहिती पोलिसांना उशिराने एखाद्या व्यक्तीकडून मिळत असून तो पर्यंत मोठा अवधी निघून गेलेला असल्याने घडलेल्या गोष्टीचा तपास करण्यासाठी पोलिसांना मोठ्या प्रमाणात कसरत करावी लागत असतानाचे चित्र दिसून येत आहे. आज तालुक्यात ठाकूर निमगाव , गदेवाडी,सुलतानपूर बुद्रुक,चापडगाव ,ठाकूर पिंपळगाव , राक्षी,भातकुडगाव , वडुले बुद्रुक,अधोडी, प्रभुवाडगाव,तळणी, मडका, वडुले खुर्द, नजीक बाभुळगाव , खामपिंपरी, गायकवाड जळगाव ,आखेगाव, हसनापूर,लाडजळगाव, एरंडगाव,राणेगाव , भगूर ,सुलतानपूर खुर्द व सोनविहीर याच फक्त २५ गावात आज रोजी कामगार पोलिस पाटील हे कार्यरत असून उर्वरित ८८ गावे ही पोलिस पाटील विना असल्याने त्या ठिकाणी तात्काळ नव्याने पोलिस पाटील भरती करावी अशीही मागणी अनेक नागरिकांच्या तोंडून ऐकावयास मिळत आहे.

# राष्ट्रीय बेसबॉल स्पर्धेत आदित्य काळेला रौप्यपदक



**ढोरजळगांव :** ओरिसा येथील भुवनेश्वर येथे झालेल्या ३१ व्या सब-ज्युनिअर राष्ट्रीय बेसबॉल स्पर्धेत शेवगावच्या निर्मल ब्राईट फ्युचर स्कूलचा इयत्ता ९ वीचा विद्यार्थी आदित्य संदीप काळे याने रौप्यपदक पटकावले आहे. त्याच्या या यशामुळे शेवगाव परिसराचे नाव राष्ट्रीय स्तरावर पोहचविले आहे. आदित्यच्या या यशाबद्दल आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे अध्यक्ष ड. डॉ. विद्याधर काकडे, जिल्हा परिषद सदस्या सौ हर्षदाताई काकडे, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा. लक्ष्मण बिटाळ, विश्वस्त पृथ्वीसिंग काकडे, शिक्षण विभाग प्रमुख श्रीमती वंदना पुजारी, आशोक आहेर, ज्ञानेश्वर लबडे प्राचार्य दत्तात्रय मोरे यांनी अभिनंदन केले आहे.त्याला आशिष मेहेत्रे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

# चोराचीवाडी येथे सामूहिक अभिष्टचिंतन सोहळा उत्साहात संपन्न



**लिंपणगाव :** श्रीगोंदा तालुक्यातील चोराचीवाडी येथे सहकारी सोसायटीच्या वतीने चेअरमन, व्हाइस चेअरमन व संचालक मंडळाच्या पुढाकारातून गावातील ४० ग्रामस्थांचा सामूहिक वाढदिवस साजरा करून अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. हा अनोखा उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून माजी सभापती गणेश झिटे, भाजपा युवा मोर्चाचे अध्यक्ष अक्षय अनभुले, सरपंच अजित लकडे तसेच परसराम कोथिंबीरे उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते वाढदिवस असलेल्या ग्रामस्थांचा सत्कार करून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी उपस्थित मान्यवरांनी सामाजिक एकोपा व गावातील परस्पर स्नेह वृद्धिंगत करण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. सामूहिक अभिष्टचिंतनामुळे ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात येत आहे. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सहकारी सोसायटीचे पदाधिकारी, संचालक मंडळ तसेच ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले. मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित राहिल्याने कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# अमरापूरात जलसंधारण जागरूकता युवा जलदिंडी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**अमरापूर :** युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार अंतर्गत माय भारत, यशदा (महाराष्ट्र शासन), युनिसेफ तसेच श्री लक्ष्मणराव त्र्यंबकराव नाकाडे फार्मसी कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत असलेल्या जलसंधारण जागरूकता युवा जलदिंडी अभियानाचे अमरापूर येथे उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले.

जलसंवर्धन, पाणी बचत आणि पर्यावरण संरक्षणाचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने सुरू असलेल्या या अभियानाला अमरापूर ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. जलदिंडीचे गावात आगमन होताच सरपंच आशाताई गरड यांच्या हस्ते स्वागत करण्यात आले.

यावेळी गावातील सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब चौधरी, ड. श्रीकृष्ण मुरकुटे, महेश काकडे, बाळासाहेब पोटफोडे, धर्मराज सुरवसे, राजेंद्र कळमकर, शुभम उकिर्डे, फलके सर, लोखंडे सर, रोहिणी काकडे, पूनम घाडगे यांच्यासह ग्रामस्थ, युवक-युवती यांनी सहभाग नोंदविला.

अभियानांतर्गत जलसंवर्धन जनजागृती फेरी, पाणी बचतीविषयी प्रबोधन, वृक्षारोपण तसेच श्रमदान यांसारखे विविध उपक्रम राबविण्यात आले. युवक व ग्रामस्थांनी एकत्रितपणे श्रमदान करून परिसर स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. तसेच विविध ठिकाणी वृक्षारोपण करून हरित पर्यावरण निर्मितीसाठी आपले योगदान नोंदविले.

यावेळी पावसाच्या पाण्याचे संकलन, भूजल पातळी वाढविण्याचे उपाय, जलस्रोतांचे संवर्धन आणि पर्यावरण संरक्षणाचे महत्त्व याविषयी नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले. युवकांनी घोषणाबाजी, संवाद आणि जनजागृती फेरीच्या माध्यमातून पाणी वाचवा - जीवन वाचवा हा संदेश प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचविला.

# चिखली-कोरेगाव शिव रस्त्याचे सीमांकन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लिंपणगाव :** श्रीगोंदा तालुक्यातील चिखली कोरेगाव शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण असलेल्या चिखली-कोरेगाव येथील सुमारे पाच किलोमीटर लांबीच्या शिव रस्त्याचे यशस्वी सीमांकन करण्यात आले आहे. त्यामुळे या परिसरातील शेतकऱ्यांच्या वहिवाटीचा आणि शेती विकासाचा मार्ग अधिक सुलभ होणार आहे.

मा. श्रीकुमार चिंचकर (उपविभागीय अधिकारी, श्रीगोंदा-पारनेर), मा. सचिन डोंगरे (तहसीलदार, श्रीगोंदा) तसेच मा. अविनाश मिसाळ (उपअधीक्षक, भूमी अभिलेख) यांच्या आदेशानुसार आणि शिव पाणंद शेत रस्ते चळवळीचे मार्गदर्शक दादासाहेब जंगले पाटील,गोरख कडूस पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मोजणी अधिकारी श्री. वासुदेव पाटील यांनी सदर रस्त्याचे सीमांकन यशस्वीरीत्या पूर्ण केले.

या रस्त्यासाठी चिखली गावचे सरपंच श्री. कुलदीप भैय्या कदम पाटील, अजिंक्य झेंडे सर, रामदास झेंडे सर यांनी गेल्या तीन ते चार वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा केला होता. अनेक अडचणींवर मात करत त्यांनी शिवपानंद चळवळ व प्रशासनाशी समन्वय साधून शेतकऱ्यांच्या हक्काच्या रस्त्यासाठी संघर्ष केला. त्यांच्या चिकाटीला आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांना अखेर यश मिळाले असून हा दिवस चिखली व कोरेगाव परिसरातील शेतकऱ्यांसाठी ऐतिहासिक ठरला आहे.

सीमांकनाच्या वेळी दादासाहेब जंगले पाटील, वासुदेव पाटील,ग्राम महसूल अधिकारी भूषण कनगरे, बेलवंडी पोलीस स्टेशन चे वाघ पवार साहेब, चिखली गावचे सरपंच कुलदीप भैय्या कदम, उप-सरपंच अक्षय बोखारे, माजी सरपंच मच्छिंद्र झेंडे,सामाजिक कार्यकर्त्या मनाली झेंडे पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष केशव झेंडे, उपाध्यक्ष शिवाजी झेंडे, गोवर्धन कार्ले, विजयसिंह पाटील, सुहास झेंडे, विक्रम झेंडे, प्रदीप कार्ले, अंबादास कार्ले,अशोक झेंडे, ज्ञानेश्वर झेंडे, राजू शेख, सदाशिव ताठे,संभाजी कदम,दिपक झेंडे,जालिंदर झेंडे,विष्णू झेंडे,संदीप कासार, पप्पू कर्पे,केशव चौधरी ,सर्व शिव लगत चे शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित शेतकऱ्यांनी प्रशासन, भूमी अभिलेख विभाग आणि शिव पाणंद शेत रस्ते चळवळीचे आभार व्यक्त केले. शिव पाणंद शेत रस्ते चळवळीच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे श्रीगोंदा तालुक्यात गावजोड रस्ते, शिव रस्ते आणि पाणंद रस्त्यांची कामे वेगाने मार्गी लागत असून श्रीगोंदा रस्ते आदर्श तालुका या संकल्पनेकडे तालुक्याची यशस्वी वाटचाल सुरू असल्याचे या कार्यातून पुन्हा अधोरेखित झाले आहे.

# सहकारी साखर कारखानदारी ही कामधेनू : नागवडे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लिंपणगाव :** सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखाना ही तालुक्याच्या विकासाची कामधेनू असून तिचे जतन करण्याची सामूहिक जबाबदारी संचालक मंडळासह सभासद, ऊस उत्पादक शेतकरी व कामगार यांची असल्याचे प्रतिपादन कारखान्याचे चेअरमन राजेंद्र नागवडे यांनी केले.

कारखान्याच्या सन २०२६-२७ या ५२ व्या गळीत हंगामाचा रोलर पूजेचा कार्यक्रम मंगळवार दि. २ रोजी कारखान्याच्या इंजिनिअरिंग विभागात संपन्न झाला. कारखान्याच्या व्हा. चेअरमन मेघा औटी यांचे पती संदीप औटी, संचालक एकनाथराव आळेकर, विश्वनाथ गिरमकर, बंडू जगताप व आप्पासाहेब धायगुडे यांचे हस्ते पूजा करण्यात आली. यावेळी कारखाना सेवेतून सेवानिवृत्त होत असलेल्या २२ सेवकांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना नागवडे म्हणाले की, एकेकाळी दुष्काळग्रस्त असणाऱ्या श्रीगोंदा तालुक्याचे नंदनवन करण्याकरिता स्व. शिवाजीराव बापू नागवडे यांनी अथक परिश्रम घेतले म्हणूनच आज आपण ५२ व्या गळीत हंगामाची तयारी करत आहोत याचा आनंद होत आहे. या कारखान्याच्या माध्यमातून हजारो लोकांचे प्रपंच उभे राहिले व त्यांच्या जीवनाला उंची प्राप्त झाली. परंतु बदलत्या काळात सहकारी साखर कारखान्यांसमोर अनेक आव्हाने उभी राहिली आहेत. या आव्हानांचा सामना करून तालुक्याच्या विकासाच्या या कामधेनूचे संरक्षण व संवर्धन करण्याची जबाबदारी सर्वांची आहे. संचालक सुभाष शिंदे यांनी प्रास्ताविक केले. सेवानिवृत्त सेवक संजय मेहेत्रे व किसन कोल्हटकर नागवडे परिवाराप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

# पाथर्डीत वाळु वाहतूक करणाऱ्या ढंपरला नागपुरच्या रिक्षाचा क्रमांक!

## पकडलेली गाडी सोडविताना कोर्टात दिले बनावट आर.सी.बुक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**





**पाथर्डी :** बेकायदेशीर वाळू वाहतूक करताना जप्त करण्यात आलेली ढंपर गाडी कोर्टातून सोडवून घेण्यासाठी चक्क बनावट आर.सी.बुक आणि खोटे कागदपत्रे तयार करून महसूल प्रशासनाची, पोलिसांची व न्यायालयाची फसवणूक करण्याचा एक धक्कादायक प्रकार पाथर्डी येथे उघडकीस आला आहे. पाथर्डी पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या एका अवैध वाळू वाहतुकीच्या गुन्ह्याचा पोलिसांचे पथक तपास करत होते. या गुन्ह्यात पोलिसांनी आरोपी कुंडलीक विष्णू काकडे (वय २८, रा. तोंडोळी, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर) याच्या ताब्यातील टाटा ढंपर गाडी जप्त करून ती पाथर्डी पोलिस ठाण्याच्या आवारात लावली होती. सदर गुन्ह्याचा तपास पोहेकॉ सुहास बाबासाहेब बटुळे यांच्याकडे वर्ग करण्यात आला होता. तपास सुरू असताना आरोपी कुंडलीक काकडे याने जप्त झालेली गाडी सोडवण्यासाठी पोलिसांसमोर एक आर.सी.बुक सादर केले, ज्यावर ढंपरचा क्रमांक MH-३२-Q-४७४४ आणि मालकाचे नाव स्वतःचेच (कुंडलीक विष्णू काकडे, पत्ता- तोंडोळी, ता. पाथर्डी) असल्याचे दाखवले होते. पोलिसांनी तपासासाठी या आर.सी.बुकची छायांकित प्रत आरोपीच्या स्वतःच्या स्वाक्षरीसह ताब्यात घेतली. मात्र संशय आल्याने तपास अधिकारी हेडकॉन्स्टेबल सुहास बटुळे यांनी ढंपरच्या मूळ चेसीस नंबर M-T३७३१२२F1B०४२२० आणि इंजिन नंबर ६९७TC६९BUY१०२२६८ वरून प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून (RTO) अधिकृत पत्राद्वारे सविस्तर माहिती मागवली. आरटीओ अहवालानुसार जप्त केलेल्या डंपरचा खरा नंबर MH-३२-Q-४९४४ असून, त्याचे मूळ मालक राजेश खवाशी (पत्ता- पालोरा, ता. कारंजा, नागपूर-अमरावती रोड, वर्धा, जिल्हा वर्धा) हे असल्याचे उघड झाले. सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, आरोपीने ढंपरचा म्हणून जो नंबर (MH-३२-Q-४७४४) पोलिसांना दाखवला होता, तो क्रमांक ई-चलन वापरून तपासला असता तो डंपरचा नसून नागपूर येथील योगेश खोब्रागडे (पत्ता- जुना कळमना, नागपूर) यांच्या मालकीच्या एका ऑटो रिक्षाचा असल्याचे निष्पन्न झाले. काकडे याने जप्त झालेली ढंपर गाडी कोर्टातून सोडविण्यासाठी मूळ मालकाचे नाव, पत्ता आणि गाडीचा नंबर यामध्ये फेरबदल करून बनावट आर.सी.बुक तयार केले. हे बनावट कागदपत्र पोलिसांना सादर केले. याबाबत पोहेकॉ. सुहास बटुळे यांच्या फिर्यादीवरून कुंडलीक काकडे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# अपघाती निधनानंतर कर्जदारास १० लाखांचा विमा

## बेलवंडी व्यापारी पतसंस्थेचा संकटकाळात कुटुंबाला आर्थिक आधार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**बेलवंडी :** सभासद आणि कर्जदारांच्या हितासाठी सातत्याने कार्यरत असलेल्या बेलवंडी व्यापारी पतसंस्थेने पुन्हा एकदा आपल्या सामाजिक बांधिलकीचा प्रत्यय दिला आहे. पतसंस्थेचे कर्जदार स्व. चंद्रकांत पंडित लबडे यांचे दुर्दैवी अपघाती निधन झाल्यानंतर त्यांच्या कुटुंबाला आर्थिक आधार मिळावा यासाठी बजाज जनरल इन्शुरन्स कंपनीच्या अपघाती विमा योजनेअंतर्गत मिळालेला १० लाख २० हजार रुपयांचा धनादेश त्यांचे वारस संदीप चंद्रकांत लबडे आणि पत्नी लताबाई चंद्रकांत लबडे यांना चेअरमन उत्तम डाके, मार्गदर्शक सोपान हिरवे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

पतसंस्थेच्या कार्यालयात आयोजित कार्यक्रमात हा धनादेश लाभार्थी कुटुंबीयांच्या स्वाधीन करण्यात आला. कुटुंबप्रमुखाच्या आकस्मिक निधनामुळे निर्माण झालेल्या आर्थिक संकटाच्या काळात ही मदत मोठा आधार ठरणार असल्याची भावना पतसंस्थाचे चेअरमन उत्तम डाके यांनी व्यक्त केली.

ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिकांना आर्थिक सुरक्षितता मिळावी यासाठी बेलवंडी व्यापारी पतसंस्था विविध योजना राबवत आहे. कर्जदारांना दिल्या जाणाऱ्या विमा संरक्षणामुळे संकटकाळात कुटुंबाला मोठा दिलासा मिळत असून संस्थेच्या या उपक्रमाचे सभासदांमधून कौतुक होत आहे. आर्थिक व्यवहारांसोबतच सामाजिक उत्तरदायित्व जपत सभासदांच्या हितासाठी कार्य करणारी संस्था म्हणून बेलवंडी व्यापारी पतसंस्थेने परिसरात वेगळी ओळख निर्माण केली आहे.

यावेळी पतसंस्थेचे मार्गदर्शक सोपान हिरवे,संचालक युवराज पवार, अर्जुन हिवरकर, विठ्ठल लोखंडे, सचिव किसन वऱ्हाडे कर्मचारी तसेच सभासद उपस्थित होते. लाभार्थी संदीप चंद्रकांत लबडे यांनी बेलवंडी व्यापारी पतसंस्था, चेअरमन उत्तम डाके आणि बजाज जनरल इन्शुरन्स कंपनीचे आभार मानले.

संस्थेचे चेअरमन उत्तम डाके यांच्या नेतृत्वाखाली पतसंस्थेने प्रगतीची नवी उंची गाठली आहे. पारदर्शक कारभार, सभासदांप्रती असलेली बांधिलकी आणि लोकाभिमुख निर्णय यामुळे संस्थेवर सभासदांचा विश्वास अधिक दृढ झाला आहे. सभासदांच्या अडीअडचणीच्या काळात त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची भूमिका पतसंस्था सातत्याने निभावत असल्याने संस्थेचा आदर्श इतर सहकारी संस्थांसमोर निर्माण झाला आहे.

# जुन्या भांडणातून कर्जतमध्ये दोन गटात हाणामारी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कर्जत :** सोमवारी संध्याकाळी कर्जत शहरातील एका वाईन्स शॉपीवर पाच जणांनी दुकान चालकास कोयत्याचा धाक दाखवत काठीने तसेच लाथा-बुक्क्यांनी मारहाण करीत दुकानाच्या गल्ल्यातील ५५ हजार रक्कम बळजबरीने चोरून नेली. तर याच घटनेत जुन्या भांडण्याच्या कारणावरून दुकान चालकांनी जातीवाचक शिवीगाळ करीत लोखंडी रॉड, लाकडी दांडके, दगड आणि फायबर पाईपने जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. याबाबत परस्पर विरोधी फिर्यादी कर्जत पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आल्या. या घटनेने कर्जत शहरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

१ जून रोजी संध्याकाळी कर्जत शहरातील संजीवनी वाईन्स या दुकानात दत्ता सिताराम भैलुमे, पवन विशाल भैलुमे, शुभम ईश्वर कदम (सिद्धार्थनगर कर्जत) राहुल हिरामण पवार (भापकर मळा, कर्जत) आणि प्रणव सुनिल गोरे (गायकरवाडी ता. कर्जत) यांनी कोयत्याचा धाक दाखवत दुकानातील महादेव मारुती

**परस्पर विरोधी फिर्यादी दाखल**

शिंदे व किरण रमेश राऊत यांना लाकडी काठीने व लाथाबुक्याने मारहाण केली. संजीवनी वाईन शॉपमधील सुमारे ५० हजार रुपये रोख व ५ हजार रुपयांचा इतर मुद्देमाल चोरुन नेला. याबाबत ऋषीकेश अरुण सुरवसे यांनी फिर्याद दाखल केली. तर तेजस्विनी सीताराम भैलुमे यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, दत्ता भैलुमे यास जुन्या भांडणाच्या कारणावरुन संजीवनी वाईन्स दुकानासमोर अक्षय विठ्ठल राऊत, आशिष हनुमंत राऊत, किरण राऊत (सर्व राहणार कर्जत) आणि महादेव शिंदे (कापरेवाडी ता. कर्जत) यांनी जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने लोखंडी रॉड, खोऱ्याचे लाकडी दांडके व दगडाने आणि फायबरचे पाईपने तसेच लाथाबुक्यांनी मारहाण करून त्यास जातीवाचक शिवीगाळ केली. तसेच प्रणव गोरे यास देखील मारहाण केली. या घटनेने काही काळ बाजारपेठेत तणावाचे वातावरण बनले होते.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री
शुक्रवार दि.५ जून २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८

## वाकडी येथे ट्रॅक्टर ट्रॉलीसह तलावात गेला



**वाकडी** : राहाता तालुक्यातील वाकडी येथील खंडोबा मंदिराकडे जाणाऱ्या कमानीलगत असणाऱ्या गणेशनगर-श्रीरामपूर रस्त्यावर चालकांचा ताबा सुटल्याने ट्रॅक्टर ट्रॉलीसह पुलावरून तलावात गेल्याची घटना घडली.मात्र यात कोणतेही दुखापत झाली नसल्याचे माहिती आहे. या भागात मुख्य रस्त्यावर असलेल्या या पुलाच्या दोन्ही बाजूने अर्धवट कठडे बसवलेले आहे.त्यामुळे येथे मोठा अपघात घडण्याची शक्यता वर्तवली जात आहेत.

## सिमेंट मिक्सरखाली सापडून कामगाराचा मृत्यू

**वैजापूर** : तालुक्यातील रोटेगाव शिवारात सुरू असलेल्या सिमेंट रस्त्याच्या कामादरम्यान सिमेंट मिक्सरच्या चाकाखाली सापडून ३५ वर्षीय कामगाराचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना गुरुवारी (ता. ४) दुपारच्या सुमारास घडली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.मृत कामगाराचे नाव वाहेद अहमद शेख (वय ३५, रा. डेपो रोड, इंदिरानगर, वैजापूर) असे आहे.मिळालेल्या माहितीनुसार, रोटेगाव शिवारात तांडा वस्ती सुधार योजनेअंतर्गत सिमेंट रस्त्याचे काम सुरू होते. वाहेद शेख हे या कामावर मजूर म्हणून कार्यरत होते. काम सुरू असताना ते अचानक सिमेंट मिक्सरच्या चाकाखाली सापडले. या अपघातात त्यांना गंभीर दुखापत झाली आणि त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला.घटनेची माहिती मिळताच पंकज ठोंबरे यांच्या रुग्णवाहिकेद्वारे वाहेद शेख यांना तत्काळ वैजापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी करून दुपारी सव्वा एक वाजण्याच्या सुमारास त्यांना मृत घोषित केले. अपघाताची माहिती मिळताच भाजपाचे नेते दिनेश राजपूत यांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. दरम्यान, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार या घटनेची नोंद वैजापूर पोलीस ठाण्यात करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

# मुळा कारखाना निवडणुकीत विरोधी गटाला धक्का

**छाननीत ९ उमेदवारांचे अर्ज अपात्र** | **एकूण १८ अर्ज बाद** | **१८ जागा बिनविरोध होण्याची शक्यता?**

**विजय खंडागळे | राष्ट्र सह्याद्री**

**सोनई** : नेवासा तालुक्यातील कामधेनू असणाऱ्यामुळा सहकारी साखर कारखान्याच्या आगामी संचालक मंडळ निवडणुकीसाठी दाखल झालेल्या उमेदवारी अर्जांची छाननी प्रक्रिया बुधवारी (दि.३) रात्री उशिरापर्यंत पार पडली.

या निवडणूक निर्णय अधिकारी सुधीर पाटील यांनी जाहीर केलेल्या माहितीनुसार एकूण ९४ उमेदवारी अर्जांपैकी ७६ अर्ज वैध ठरले असून, १८ अर्ज विविध कारणांमुळे अपात्र ठरविण्यात आले आहेत. विशेष म्हणजे अपात्र ठरलेल्या अर्जांमध्ये विरोधी गटाच्या ९ उमेदवारांचा समावेश असल्याने निवडणुकीपूर्वीच विरोधी आघाडीला मोठा धक्का बसला आहे.

.छाननीनंतर विरोधी गटाचे केवळ चार उमेदवार शिल्लक राहिले असून त्यामुळे कारखान्याच्या एकूण २१ पैकी १८ जागा बिनविरोध होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अर्ज माघारीची अंतिम मुदत १८ जून असून संपूर्ण पॅनल बिनविरोध करण्यासाठी सत्ताधारी गटाकडून प्रयत्न सुरू असल्याची चर्चा आहे.छाननी अहवालानुसार सोनई गटातील १० अर्जांपैकी ८ अर्ज वैध तर २ अर्ज अपात्र ठरले. घोडेगाव गटातील सर्व ७ अर्ज वैध राहिले. खरवंडी गटातील ८ अर्जांपैकी १ अर्ज अपात्र झाला. करजगाव गटातील १८ अर्जांपैकी ३ अर्ज बाद झाले तर नेवासा गटातील १४ अर्जांपैकी ३ अर्ज अपात्र ठरले. प्रवरासंगम गटातील १० अर्जांपैकी ४ अर्ज नामंजूर करण्यात आले.

उत्पादक सहकारी संस्था व बिगर उत्पादक संस्था गटातील दोन्ही अर्ज वैध ठरले. अनुसूचित जाती-जमाती प्रतिनिधी गटातील सर्व ३ अर्ज पात्र ठरले. महिला प्रतिनिधी गटातील ९ अर्जांपैकी २ अर्ज अपात्र झाले, तर इतर मागासवर्गीय गटातील ४ अर्जांपैकी १ अर्ज बाद झाला. भटकी-विमुक्त जाती-जमाती गटातील ९ अर्जांपैकी २ अर्ज अपात्र ठरल्याची नोंद करण्यात आली.मुळा साखर कारखान्याची निवडणूक नेवासा तालुक्यातील सहकार आणि राजकीय क्षेत्रासाठी प्रतिष्ठेची मानली जाते. सत्ताधारी गटाकडून माजी मंत्री शंकरराव गडाख यांच्या नेतृत्वाखाली उमेदवार रिंगणात उतरले आहेत, तर विरोधी गटाकडून आमदार विठ्ठलराव लंघे आणि उद्योजक प्रभाकर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले होते.छाननी प्रक्रियेनंतर अनेक मतदारसंघांतील निवडणुकीचे चित्र स्पष्ट झाले असून आता सर्वांचे लक्ष अर्ज माघारीच्या प्रक्रियेकडे लागले आहे. काही जागा बिनविरोध होण्याची शक्यता असली तरी उर्वरित जागांसाठी चुरशीची लढत होण्याचे संकेत मिळत आहेत. विरोधी गटाकडून अपूर्ण पॅनल उभे राहिल्याने सोशल मीडियावरही आरोप-प्रत्यारोपांना उधाण आले आहे.

सध्याच्या स्थितीनुसार करजगाव गटातील दोन जागांसाठी तीन उमेदवार आणि महिला प्रतिनिधी गटातील एका जागेसाठी उमेदवार शिल्लक राहण्याची शक्यता असून २१पैकी १८ जागा बिनविरोध होण्याच्या मार्गावर असल्याचे चित्र दिसून येत आहे.



### अपात्र ठरलेले विरोधी गटाचे उमेदवार

बाबासाहेब बेल्हेकर (सोनई गट)
शिवाजी दराडे (सोनई गट)
बाळासाहेब गोसावी (भटकी-विमुक्त जाती गट)
अर्जुन मोटे (खरवंडी गट)
भाऊसाहेब चिंधे (नेवासा गट)
दादा होन (करजगाव गट)
लक्ष्मण माकोने (नेवासा गट)
विलास चव्हाण (प्रवरासंगम गट)
मछिंद्र पवार (करजगाव गट)

### शिल्लक राहिलेले विरोधी गटाचे उमेदवार

किरण जाधव (करजगाव गट)
गोरख जाधव (करजगाव गट)
सौ.मीराबाई दिवटे भानसहिवरे (महिला प्रतिनिधी गट)
नारायण डौले (करजगाव गट)

## साईबाबा हॉस्पिटलला १२.८० लाखांची वैद्यकीय उपकरणे भेट

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : साईबाबा संस्थानच्या श्री साईबाबा हॉस्पिटलला हैदराबाद येथील साईभक्त साईदीप अन्नदाता यांनी सुमारे १२ लाख ८० हजार रुपये किमतीची सेंट्रल व्हॅक्यूम पंप व एअर ड्रायर ही अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणे देणगी स्वरूपात प्रदान केली.

रुग्णालयातील शस्त्रक्रिया कक्ष, अतिदक्षता विभाग तसेच विविध वॉर्डमध्ये रुग्णांच्या उपचारासाठी आवश्यक असलेली ही उपकरणे अत्यंत उपयुक्त ठरणार आहेत. सेंट्रल व्हॅक्यूम पंपद्वारे सक्शनसाठी आवश्यक व्हॅक्यूम निर्माण केला जातो, तर एअर ड्रायरद्वारे कॉम्प्रेस्ड एअरमधील ओलावा काढून स्वच्छ व कोरडी हवा उपलब्ध करून दिली जाते. त्यामुळे वैद्यकीय उपकरणांची कार्यक्षमता वाढून रुग्णसेवा अधिक परिणामकारक होण्यास मदत होणार आहे.याप्रसंगी श्री साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांच्या हस्ते साईदीप अन्नदाता यांचे रुग्णसेवेसाठी दिलेल्या मोलाच्या योगदानाबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी रुग्णालयातील वैद्यकीय संचालक डॉ. प्रीतम वडगावे, आधीसेविका मंदा थोरात, जनसंपर्क अधिकारी सुरेश टोलमारे, बायोमेडिकल इंजिनियर श्रद्धा कोते, प्रणाली कांबळे, कार्तिक पांगारकर यांच्यासह वैद्यकीय अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.



## जुन्या वादातून एकावर वार वडाळा महादेव येथील घटना

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : जुन्या वादातून एकास धारदार शस्त्राने छातीत वार केल्याचा प्रकार श्रीरामपूर तालुक्यातील वडाळा महादेव येथे घडला.याबाबत अधिक माहिती अशी की, राम भाऊसाहेब वायकर,(रा.वडाळा महादेव) हा जेवण करून रात्री ९ वाजेच्या दरम्यान दुकानात काहीतरी कामानिमित्त गेला होते.

येथून परत माघारी येताना असताना ग्रामपंचायत कार्यालयाजवळील आडीजवळ सहा ते सात इसम मला दिसले.ते अंधारातून बाहेर आले,तेव्हा राम वायकर यांच्याशी जुना घरगुती झालेल्या वादातील आदित्य छबू वायकर, मुकेश इंगळे व आणखी दोन इसम त्याला दिसले.त्यांनी राम यास पकडून यापैकी ज्ञानेश्वर गांगुर्डे याने त्याच्याकडील धारदार हत्याराने राम यांच्या छातीत वार करून जखमी केले.त्यानंतर त्यांच्या तावडीतून सुटका करत पळून जाण्याचा प्रयत्न करत असताना, त्याला पकडणाऱ्या दोघांच्या कंबरेला राम याला गावठी कट्टा दिसला.त्यामुळे तो जोराने धक्का देवून जीव वाचवण्यासाठी पळाला. त्यानंतर घराजवळ एकजण दिसल्याने त्याला आवाज देवून राम याने नातेवाईकांच्या मदतीने आणि रूग्णालय नेले.याप्रकरणी राम वायकर यांच्या फिर्यादीवरून आदित्य छबू वायकर, मुकेश सुकदेव इंगळे, ज्ञानेश्वर आण्णासाहेब गांगुर्डे, सागर भाऊराव कुदळे व इतर दोन अनोळखी यांच्याविरूद्ध गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास श्रीरामपूर शहर पोलीस करीत आहेत.

## पोलीस असल्याची बतावणी करून महिलेचे दागिने लंपास

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : शहरातील थत्ते ग्राउंड परिसरात पोलीस असल्याची बतावणी करून एका महिलेचे सुमारे १ लाख ५ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने लंपास केल्याची धक्कादायक घटना बुधवारी (दि. ३ जून) सकाळी घडली.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, समता कॉलनी येथील सुप्रिया प्रदीप बालोटे या सकाळी आयसीआयसीआय बँकेच्या एटीएममधून पैसे काढून पायी घरी परतत होत्या. सुमारे साडेनऊच्या सुमारास थत्ते ग्राउंडकडे जाणाऱ्या रस्त्यावर तीन अनोळखी इसमांनी त्यांना अडवले. एका इसमाने हेल्मेट घातले होते, दुसऱ्याने तोंडाला रूमाल बांधला होता, तर तिसऱ्याने टोपी व गॉगल परिधान केला होता.या तिघांनी स्वतःला पोलिसांचे माणूस असल्याचे भासवून, समोर साहेब उभे आहेत. गळ्यातील मंगळसूत्र व हातातील बांगड्या काढा, अन्यथा दंड होईल, असे सांगितले. त्यावर बालोटे यांनी मंगळसूत्र व सोन्याच्या बांगड्या काढून पर्समध्ये ठेवल्या. त्यानंतर एका भामट्याने दागिने नीट ठेवले आहेत का हे पाहण्याच्या बहाण्याने पर्समध्ये हात घातला.काही क्षणांतच तिघेही मोटारसायकलवरून बेलापूरच्या दिशेने पसार झाले. घरी गेल्यानंतर पर्स तपासली असता मंगळसूत्र व सोन्याच्या बांगड्या गायब असल्याचे बालोटे यांच्या लक्षात आले. फसवणूक झाल्याचे समजताच त्यांनी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.या प्रकरणी तीन अज्ञात भामट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, श्रीरामपूर शहर पोलीस पुढील तपास करीत आहेत. या घटनेमुळे शहरात खळबळ उडाली असून नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

## सावधान ! बियर शॉपी समोर मद्यपान कराल तर

**पो.नि. गलांडे यांचा कारवाईचा सज्जड इशारा**

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : पोलीस ठाण्याच्या अगदी हाकेच्या अंतरावर असणाऱ्या बियर शॉप समोर उघड्यावर मद्यपान करणाऱ्या मद्यपींना व शॉप चालकांना शिर्डीचे पो नि रणजीत गलांडे यांनी चांगलाच दम भरला असून यापुढील काळात बियर शॉपीवर कुणी मद्यपान करताना आढळल्यास मालका सह मदयपीवर गुन्हे दाखल करणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे .

शिर्डी पोलीस ठाण्याच्या अगदी हाकेच्या अंतरावर दोन बियर शॉपि असून तेथे राजरोस पणे ग्राहक उघड्यावर बसून मद्यपान करत असतात . त्यामुळे कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे . बियर शॉपि दुकानदारांना फक्त विक्री करण्याचा परवाना असताना एक्साईज विभागाचे नियम धाब्यावर बसवून मदयपी साठी पिण्याची मुभा दिली जाते तर काहींनी मद्यपान करण्यासाठी ग्राहकांना बसण्याची व्यवस्था केली असून समोर दुकाने टाकून खाद्यपदार्थ उपलब्ध करून दिली जात असल्याचे पोलीस प्रशासनाचे निदर्शनास आले होते . त्यामुळे हाणामाऱ्या सारखे प्रकार वाढत असल्याचे प्रमाण वाढले आहे . शिर्डीत साई भक्तांना याचा त्रास होत असतो . सार्वजनिक ठिकाणी मद्यपान करून गोंधळ घालणाऱ्यांविरोधात शिर्डी पोलिसांनी कडक भूमिका घेतली असून काल रात्री बिअर शॉपसमोर उभे राहून मद्यपान करणाऱ्या व्यक्तींवर धडक कारवाई करण्यात आली. पोलिसांच्या या कारवाईमुळे मद्यपींमध्ये एकच खळबळ उडाली आहे . शहरातील काही बिअर शॉपसमोर मद्यपान केल्यानंतर अनेकदा वाद, शिवीगाळ आणि मारामारी होत असल्याच्या तक्रारी पोलिसांकडे प्राप्त झाल्या होत्या. या पार्श्वभूमीवर पोलीस निरीक्षक रणजित गलांडे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष मोहीम राबविण्यात आली.कारवाई दरम्यान सार्वजनिक ठिकाणी मद्यपान करणाऱ्यांना पोलिसांनी चांगलाच दम भरला. तसेच बिअर शॉप चालकांनाही स्पष्ट शब्दांत ताकीद देण्यात आली की, दुकानासमोर अथवा परिसरात कोणालाही मद्यप्राशन करू देऊ नये. नियमांचे उल्लंघन झाल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.




# मंजूर बंधाऱ्याला ४१.५१ कोटींची नवसंजीवनी; दुरुस्तीचे काम पूर्णत्वाकडे

## सात गावाला मिळणार जीवदान

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी** : कोपरगाव तालुक्याच्या पश्चिम भागातील मंजूर, चास नळी, बक्तरपूर,धामोरी, मोर्वीस, मायगाव देवी, कारवाडी आदी गावातील शेती व शेतकऱ्यांचा अतिशय जिव्हाळ्याच्या असलेल्या मंजूर बंधाऱ्याच्या दुरुस्तीसाठी निधी मिळावा यासाठी भल्या पहाटे अजितदादांची भेट घेवून त्यांच्यापुढे वास्तव परिस्थिती मांडली होती. त्यावेळी शेतकऱ्यांची जाण असलेल्या अजितदादांनी दुरुस्तीच्या कामासाठी लागणाऱ्या निधीची तरतूद अर्थसंकल्पात करून मंजूर बंधाऱ्याच्या दुरुस्तीसाठी ४१.५१ कोटी निधी दिल्यामुळे मंजूर बंधाऱ्याच्या दुरुस्तीचे काम पूर्णत्वाकडे जात असल्याचे आ.आशुतोष काळे यांनी सांगितले.

आ.आशुतोष काळे यांनी पाटबंधारे विभागाचे अधिकारी व मंजूर, चास नळी, बक्तरपूर,धामोरी, मोर्वीस, मायगाव देवी, कारवाडी आदी गावातील ग्रामस्थांसमवेत गुरुवार (दि.०४) रोजी मंजूर बंधाऱ्याच्या अंतिम टप्यात आलेल्या दुरुस्तीच्या कामाची पाहणी केली यावेळी उपस्थित ग्रामस्थांशी संवाद साधतांना ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, नैसर्गिक आपत्तीमुळे मंजूर बंधारा आजवर तब्बल तीन वेळेस वाहून गेल्यामुळे मंजूर बंधाऱ्यावर अवलंबून असणाऱ्या मंजूर, चास नळी, हंडेवाडी,धामोरी, मोर्वीस, मायगाव देवी, कारवाडी आदी गावातील शेती व शेतकऱ्यांचे भविष्य अंधकारमय होवून त्याचा परिणाम शेतकऱ्यांच्या अर्थकारणावर झाला होता. त्यामुळे मंजूर बंधाऱ्याच्या दुरुस्तीकडे सातही गावातील शेतकरी मोठ्या अपेक्षेने पाहत होते. शेतकऱ्यांच्या अत्यंत जिव्हाळ्याचा असलेला मंजूर बंधाऱ्याच्या दुरुस्तीचा प्रश्न मार्गी लावू असा शब्द दिला होता. त्यासाठी मंजूर बंधाऱ्याच्या दुरुस्तीचा प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देऊन प्रस्ताव आणि डिझाईन तयार करून घेतली. हा प्रस्ताव मंत्रालयात जलसंपदा विभागात स्वत: घेऊन गेलो असता त्यांनी जल संधारण विभाग, जलसंधारण विभागाने जलयुक्त शिवार विभागाकडे पाठविले. प्रस्ताव मंजूर करण्यासाठी अनंत अडचणी पण आल्या अखेर हे काम जलसंपदा विभागाचे असल्यामुळे जलसंपदा विभागाकडे प्रस्ताव सादर करुन तातडीने मंजुरी मिळवली आणि अजितदादांच्या अनमोल सहकार्यातून बंधाऱ्याच्या दुरुस्तीसाठी ४१.५१ कोटी निधी मिळविण्यात यशस्वी झालो.मंजूर बंधाऱ्याचे काम अंतिम टप्याकडे जात असतांना जेवढा निधी मंजूर बंधाऱ्याच्या निर्मितीसाठी लागला नाही त्याच्या कित्येक पट निधी दुरुस्तीसाठी खर्च होणार असला तरी यामागे स्व.अजितदादा पवार यांचे अनमोल योगदान असल्यामुळे त्यांची प्रकर्षाने आठवण येते. मागील वर्षी काम सुरु केले होते परंतु पावसाळा लवकर सुरु झाल्यामुळे झालेले काम वाया गेले. परंतु चालूवर्षी पावसाळा सुरु व्हायच्या आत काम पूर्ण करण्याच्या आणि काम दर्जेदार करण्याच्या सूचना संबंधित अधिकारी व ठेकेदार यांना दिल्या आहेत. त्यामुळे चालूवर्षी मंजूर बंधाऱ्यात पाणी अडविले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

याप्रसंगी प.पू. श्री शिवानंदगिरीजी महाराज, जलसंपदा विभागाचे अधिकारी, कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे व्हा. चेअरमन, संचालक मंडळ, संलग्न संस्थांचे पदाधिकारी, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, मंजूर, कारवाडी, हंडेवाडी, चासनळी, धामोरी, मोर्विस, वडगाव, बक्तरपूर, मायगाव देवी, सुरेगाव, वेळापूर, सांगवी भुसार आदी गावांतील शेतकरी, ग्रामस्थ व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### अशक्यप्राय गोष्ट आ. काळेंनी शक्य करून दाखवली

नैसर्गिक संकटामुळे तीन वेळा मंजूर बंधारा वाहून गेला. तिसऱ्यांदा ज्यावेळी हा बंधारा वाहून गेला त्यावेळी विहिरी, शेतकऱ्यांच्या जमिनी उभ्या पिकांसह वाहून जातांना व ज्यांनी ज्यांनी मंजूर बंधाऱ्याचे झालेले अतोनात नुकसान पाहिले त्यांनी हा बंधारा पुन्हा दुरुस्त होईल हि अपेक्षाच सोडून दिली होती. बंधाऱ्याची दुरावस्था पाहून ज्यांच्याकडे या बंधाऱ्याच्या देखभाल-दुरुस्तीची जबाबदारी होती त्यांनी देखील हात झटकले होते. त्यामुळे एकूणच मंजूर बंधारा पुन्हा दुरुस्त होणे हि अशक्यप्राय गोष्ट होती. मात्र हि अशक्य गोष्ट आमदार आशुतोष काळे यांनी शक्य करून दाखविली. **-शेतकऱ्यांच्या प्रतिक्रिया**